**प्रकरण 1**

## आधुनिक काळातील इतिहासलेखनप्रवाह

## इतिहासाचे प्रत्यक्षवादी तत्त्वज्ञान (*Positivist*)

युरोपीय इतिहासलेखन क्षेत्रात एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात चार नवे लेखनप्रवाह प्रचलित झालेले आढळून येतात. रोमँटिक, नॅशनलिस्ट, पॉझिटिविस्ट व मार्क्सिस्ट हे ते चार प्रवाह होत. ऐतिहासिक सत्याशी प्रतारणा न करता कल्पनाशक्तीला वाव देऊन लेखन रसाळ करण्याचा प्रयत्न थॉमस कार्लाइल सारख्या इतिहासलेखकांनी केला. त्यांचे लेखन रोमँटिक इतिहासलेखनात मोडते. नॅशनॅलिस्ट म्हणजे राष्ट्रवादी वृत्तीने इतिहासलेखन करणाऱ्या गटाचे प्रतिनिधित्व थॉमस मेकॉले करतो. अभिजात मार्क्सवाद हे कार्ल मार्क्स व एंजल्सचे अपत्य आहे तर पॉझिटिविस्ट म्हणजे प्रत्यक्षवादी विचारप्रणाली इतिहासाच्या क्षेत्रात प्रचलित करण्याचे श्रेय जर्मन इतिहासकार लिओपाल्ड रांके व ह्या विचाराचा प्रणेता फ्रेंच तत्त्वज्ञ ऑगस्ट कॉम्त यांना जाते.

अठराव्या शतकात युरोपमध्ये विज्ञानाचा, शास्त्रीय ज्ञानाचा विकास झपाट्याने होऊ लागला. शास्त्रीय पद्धतीचा वापर सत्याचा शोध घेण्यास लाभदायक ठरतो हा विचार बुद्धिजीवींच्या मनावर बिंबला. परिणामी सर्वच अभ्यास शाखांचे अध्ययन शास्त्रीय पद्धतीने केल्यास त्या त्या शाखेतील मूलभूत सत्याचे आकलन करून घेता येईल अशी भिन्न क्षेत्रांतील विचारवंतांची धारणा बनली. Positive knowledge म्हणजे निश्चित, निःसंदिग्ध, वादातीत स्वरूपाचे चिरंतन ज्ञान. निसर्गातील प्रक्रियामागील चिरंतन सत्याचा शोध घेण्यासाठी भौतिक शास्त्रज्ञ ज्या शास्त्रीय पद्धती वापरतात, तशाच पद्धतींचा वापर इतिहासकारांनी केल्यास गतकालीन मानवी जीवनातील सत्याचे सम्यक् आकलन होऊ शकेल ही पॉझिटिवीझमची सैद्धांतिक धारणा आहे. ह्या अनुसार गतकालीन मानवी जीवनातील वास्तवाचे शास्त्रीय पद्धतींचा वापर करून, सत्यदर्शन घडविणे हे इतिहासलेखनाच्या क्षेत्रातील 'पॉझिटिविस्ट' तत्त्वज्ञानाचे मूलभूत प्रमेय बनले.

प्रत्यक्षज्ञानवादी तत्त्वज्ञानाचा इतिहासलेखनाच्या क्षेत्रातील आविष्कारही तोवर रूढ असलेल्या इतिहासलेखनपद्धती विरुद्धची प्रतिक्रिया होती. इतिहासलेखनाच्या पद्धतीत असलेल्या उणिवा दूर करण्याचा हा प्रयत्न होता. 'हिस्टरी ॲन्ड हिस्टोरिअन्स ऑफ नाईनटीन्थ सेंचुरी' ह्या आपल्या इतिहाससमीक्षा ग्रंथात प्रा. जी. पी. गुच यांनी त्या चार उणिवांची चर्चा केली आहे. त्यांच्या मते मानवी जीवनाचे नियंत्रण करणारी दैवी शक्ती आहे ही धारणा, स्रोतसाधनांचा अभाव, चिकित्सक दृष्टीचा अभाव आणि इतिहासाचे अध्ययन व लिखाण याबाबतच्या निश्चित प्रशिक्षणाचा अभाव. या कारणांमुळे अठराव्या शतकापर्यंतच्या इतिहासलेखनाला सत्याचा, विश्वसनीयतेचा भक्कम आधार मिळाला नव्हता, इतिहास लेखनासंबंधीच्या कल्पना स्पष्ट झाल्या नव्हत्या व त्यामुळे इतिहासलेखनाला आकार आला नव्हता. इतिहासलेखन ही साहित्याच्या क्षेत्रातील बाब मानली जाई. आर्थर मार्विक ह्या इतिहास समीक्षकाने, अठराव्या शतकापर्यंत काळाच्या गतिमानतेचा, परिवर्तनशीलतेचा विचार होत नव्हता, तसेच घटना व व्यक्तींचा अभ्यास त्यांच्या समकालीन परिस्थितीच्या संदर्भात करण्याची गरज इतिहासकारांना प्रतीत झाली नव्हती, ह्या उणिवांकडे अंगुलीनिर्देश केलेला आढळतो. तोवरच्या लिखाणात गूढवादाचे दर्शन प्रामुख्याने होते. पंधराव्या शतकापर्यंतच्या ईश्वरनिष्ठ भाष्याची जागा गूढवादी भाष्याने घेतली होती. त्यामुळे इतिहासात भूतकाळाचे वास्तव चित्रण होत नव्हते. प्राथमिक स्त्रोतसाधने अभ्यासकांना सहजपणे उपलब्ध नव्हती, यामुळे इतिहास लिहिण्यासाठी बव्हंशी दुय्यम साधनांचा वापर होत असे. तसेच विद्यापीठातून इतिहासाच्या अध्ययनाची निश्चित पद्धती शिकविण्याचा शिरस्ता नव्हता, त्या विषयाचा गंभीरपणे अभ्यास होत नव्हता. इतिहासाला गौण स्थान होते.

याविरुद्ध प्रतिक्रिया एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी दिसून येऊ लागल्या. मानवी जीवनासंबंधी प्रचलित असलेल्या रूढ विचारांना छेद देणाऱ्या जोहान हर्डर व व्हिका ह्या तत्त्वज्ञांच्या क्रांतिकारी विचारप्रणालीकडे विचारवंतांचे लक्ष आकृष्ट होऊन, इतिहासाकडे वेगळ्या दृष्टीने पाहण्याची गरज प्रतीत होऊ लागली. इतिहासलेखनात कल्पनेला स्थान असावे, तो केवळ गूढ़वादी नव्हे तर रंजक असावा हा विचार 'रोमँटिक' इतिहासलेखकांनी पुरस्कृत केला; प्राथमिक स्त्रोतसाधनांचा अभ्यास करून, केवळ युद्धे अगर मोठ्या घटनांचे नव्हे तर राष्ट्रांचे इतिहास लिहिण्यावर राष्ट्रीय

वृत्तीच्या गटाने भर दिला, तर मूळ स्त्रोतसाधनांची चिकित्सक छाननी करून ऐतिहासिक सत्य शोधून काढण्यावर लक्ष केंद्रित करणारा इतिहासकारांचा एक गट पुढे सरसावला. एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी इतिहासाच्या सहाय्यकारी शास्त्रांचा अभ्यास गंभीरपणे होऊ लागला; यामुळे इतिहासाच्या साधनांची शास्त्रीय पद्धतीने चिकित्सा करून सत्याचा शोध घेता येतो याची जाणीव अभ्यासकांत निर्माण झाली. इतिहासाकडे पाहण्याचा हा नवा दृष्टिकोण रुजविण्याचे, व इतिहासविषयाच्या पद्धतशीर

अध्ययनाचे महत्त्व प्रतिपादित करण्याचे मोलाचे कार्य एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभीच्या काळात जर्मनीतील बर्लिन विद्यापीठामधील इतिहासतज्ज्ञांनी केले. त्यांच्यापैकी पहिला महत्त्वाचा इतिहासकार बार्थोल्ड निबूर (Barthold Niebuhr) हा होय. हा जन्माने डॅनिश, परंतु प्राचीन रोमचा इतिहास हा त्याच्या अध्ययनाचा विषय होता. १८१० साली बर्लिन विद्यापीठात रोमच्या इतिहासावर त्याने दिलेली भाषणे विशेष गाजली. त्या भाषणांनी शास्त्रीय इतिहासलेखन पद्धतीचा परिचय अभ्यासकांना करून दिला. रोमचा इतिहास अभ्यासण्यासाठी त्याने लिव्ही सारख्या प्राचीन रोमन इतिहासकारांचा मागोवा न घेता, प्राथमिक स्त्रोतसाधनांचा शोध घेतला. त्या स्त्रोतांची चिकित्सक छाननी करून त्यांच्या विश्वसनीयतेची खातरजमा करून घेतली. आणि त्या साधनांच्या आधारे रोमचा इतिहास, त्यांच्या संस्था, त्यांच्या समस्या यांचा अभ्यास केला. त्याच्या अध्ययनपद्धतीचे महत्त्व बर्लिन विद्यापीठातील अभ्यासकांच्या मनावर बिंबले. अशा प्रकारे नीबूरने आधुनिक इतिहासलेखनाचा पाया तयार केला. ऐतिहासिक सत्याचा शोध घेण्याचे महत्त्व प्रतिपादन करणारे त्याचे एक विधान प्रसिद्ध आहे. तो म्हणतो, "In laying down the pen, we must be able to say in the sight of God! I have not knowingly or without earnest investigation written anything which is not true" हे त्याचे विधान प्रत्यक्षवादी इतिहासलेखनाचे मार्गदर्शक तत्त्व बनले.

**लिओपोल्ड रांके (Leopold Ranke : १७९५-१८८६) :-** नीबूरच्या विचारप्रणालीने प्रभावित होऊन ह्या मार्गावर भक्कमपणे पावले टाकणारा, प्रत्यक्षवादी इतिहासलेखनाची मुहूर्तमेढ पद्धतशीरपणे रोवणारा जर्मन इतिहासकार लिओपोल्ड रांके हा होय. वस्तुतः त्याच्या अध्ययनाची सुरुवात अभिजात ग्रीक, रोमन वाङ्मय व धर्मशास्त्रापासून झाली. त्यानंतर तो आवड म्हणून इतिहासाच्या अभ्यासाकडे वळला. वयाच्या तेविसाव्या वर्षी, १८१८ साली इतिहासाचा शिक्षक म्हणून व्यावसायिक जीवनात त्याने पदार्पण केले, आणि १८२५ साली बर्लिन विद्यापीठात इतिहासाचा प्राध्यापक म्हणून रुजू झाला.

प्रारंभी इतिहासात रांकेला फार रुची नव्हती. नीबूरच्या रोमच्या इतिहासाने मात्र त्याचे मतपरिवर्तन झाले. नीबूरचे यादृष्टीने तो ऋण मान्य करतो. या सुमारास त्याने विविध ग्रंथांचे वाचन केले. त्यात ग्रीक व रोमन इतिहासकार, वॉल्टर स्कॉटच्या ऐतिहासिक कादंबऱ्या तसेच हर्डर, गधे यांच्या लिखाणाचे परिशीलन केले. यातून त्याची इतिहासविषयक भूमिका पक्की झाली. विविध प्रकारच्या ग्रंथांचे अध्ययन केल्यानंतर त्याने काढलेला निष्कर्ष त्याच्या पुढील विधानात स्पष्ट दिसतो; "*I found by comparison that truth was more interesting and beautiful than romance, I turned away from it and resolved to avoid all inventions and imagination in my works and stick to facts.*" रांकेच्या नव्या इतिहासलेखनपद्धतीचा परिचय 'History of the Latin and Teutonic People' ह्या त्याच्या पहिल्या ग्रंथाने करून दिला. ह्या ग्रंथातील आशयापेक्षा त्याला लिहिलेली प्रस्तावना व ग्रंथाला जोडलेली परिशिष्टे विशेष बोलकी ठरली. त्यात त्याची इतिहासाबाबतची धारणा तो स्पष्ट करतो. पूर्वी लिहिण्यात आलेल्या इतिवृत्तांपेक्षा ऐतिहासिक व्यक्तींची कागदपत्रे अधिक विश्वसनीय मानावीत. त्यातून त्या व्यक्तीचे विचार व व्यक्तिमत्त्व यांचा बोध होतो; तसेच इतिहासग्रंथांचा वापर करतांना लेखकाचे व्यक्तिमत्त्व, त्याचे विचार, त्याने ऐतिहासिक माहिती कोठून मिळविली याची छाननी करणे हे रांके महत्त्वाचे मानतो. त्याने आपल्या ग्रंथासाठी कोणती साधने वापरली याची यादी तर तो देतोच, त्याशिवाय त्यांची विश्वसनीयतेच्या दृष्टीने चिकित्सक तपासणी कशी केली याचीही माहिती देतो. तसेच दुय्यम साधनांची विश्वसनीयता कशी पडताळून पाहिली आणि त्यांचा वापर कोठे व कां केला तेही स्पष्ट करतो. कल्पना व गूढवाद त्याज्य मानून पुराव्यातून जे सत्य हाती आले तेच दर्शविणे, हे तो इतिहासकाराचे पवित्र कर्तव्य मानतो.

रांकेच्या संकलित लिखाणाचे सुमारे ५४ खण्ड आहेत. त्यात विशेष उल्लेखनीय म्हणजे *'History of the People'* चे तीन खण्ड, *'The German History at the time of Reformation'* हा पाच खण्डाचा ग्रंथ, याशिवाय *'History of France, The Origins of the wars of Revolution'* आणि वयाच्या ८३ व्या वर्षी लिहायला घेतलेला *'Universal History'* ह्या प्रचण्ड ग्रंथाचे सहा खण्ड हे होत.

व्यापक स्वरूपाच्या ह्या इतिहासलेखनाइतकेच त्याचे दुसरे महत्त्वाचे कार्य म्हणजे आपल्या इतिहासविषयक विचारप्रणालीचा प्रसार व प्रचार करण्यासाठी त्याने १८३३ पासून युरोपात अनेक ठिकाणी आयोजित केलेल्या कार्यशाळा, त्यातून नवोदित इतिहासकारांना केलेले मार्गदर्शन आणि आपल्या विचारप्रणालीच्या प्रसाराचे कायम व्यासपीठ म्हणून १८५९ साली सुरू केलेले एका इतिहासविषयक नियतकालिकाचे प्रकाशन हे होय. इतिहासलेखनाचा व संशोधनाचा उचित मार्ग दाखविणे, इतिहासाच्या अध्ययनात होणाऱ्या चुका दाखविणे आणि अचूक काटेकोर संशोधनाच्या मार्गाचा परिचय करून देणे ही त्याची उद्दिष्टे होती. लिओपोल्ड रांके याने इतिहासाच्या अध्ययनाबाबत व लेखनाबाबत पुढील मूलभूत तत्त्वांवर भर दिला.

१) कोणत्याही ऐतिहासिक विषयावर लिखाण करताना त्याविषयी लिहिल्या गेलेल्या ग्रंथांना दुय्यम स्थान असावे. त्या ग्रंथाचे परिशीलन करताना तो कोणी, कधी व कोणत्या परिस्थितीत लिहिला याची तपासणी करूनच त्यातील विधाने, इतर पुरावे, पडताळून पाहिल्यानंतर ग्राह्य मानावीत.

२) दुय्यम इतिहासग्रंथापेक्षा मूळ स्रोतांच्या अभ्यासावर भर द्यावा. ऐतिहासिक व्यक्तींची, ऐतिहासिक घटनेशी संबंधित असलेल्या व्यक्तींची कागदपत्रे, पत्रव्यवहार, त्यांच्या समकालीनांची कागदपत्रे हा मोलाचा पुरावा होय.

३) अशा पुराव्यांतून जे सत्य अभ्यासकाच्या हाती पडेल, त्याचाच फक्त वापर

इतिहासलेखकाने लिखाणात करावा. ऐतिहासिक सत्याचे चित्रण हे त्याचे एकमेव उद्दिष्ट असावे. ४) ऐतिहासिक लिखाणात संदर्भ, तळटीपा, संदर्भग्रंथ सूचींना फार महत्त्व आहे. कारण त्यातून मूळ आधारांची वाचकाला माहिती होते, आणि विधानांच्या सत्यतेची तपासणी करणे सुकर होते.

५) ऐतिहासिक सत्याचे संकलन केल्यानंतर लेखकाने इतिहास लिहिताना तो वस्तुनिष्ठपणे, तटस्थ वृत्तीने लिहिणे अगत्याचे आहे. त्यात आत्मनिष्ठा येऊ देऊ नये, कारण आत्मनिष्ठा डोकावल्यास ऐतिहासिक सत्याला बाधा निर्माण होते.

६) भूतकाळाचे यथार्थ दर्शन घडविणे हे अभ्यासकाचे कर्तव्य आहे. त्यामुळे इतिहास लिहितांना त्यातून उपदेश करण्याचा, बोध देण्याचा अगर मूल्यमापन करून योग्य अयोग्याचा निष्कर्ष लेखकाने काढू नये. असे केल्यास लिखाणात आत्मनिष्ठता येते. गतकाळातील घटना स्रोतसाधनातून जशा निदर्शनास आल्या, त्यांचे तसेच्या तसे निवेदन करणे या उद्दिष्टापासून विचलित होऊ नये.

लिओपोल्ड रांकेने पुरस्कृत केलेल्या ह्या प्रत्यक्षवादी इतिहासलेखन पद्धतीवर नंतरच्या काळात समीक्षकांनी काही आक्षेप घेतले. वस्तुनिष्ठेवर अवास्तव भर ही लेखनपद्धती देत असल्यामुळे लिखाणात रटाळपणा येतो; शिवाय पूर्ण वस्तुतिष्ठता इतिहासासारख्या विषयात अशक्य आहे. केवळ लिखित पुराव्याच्या आधारे इतिहास लिहायचा झाल्यास तो प्रामुख्याने राजकीय, राजनैतिक व लष्करी विषयाबाबत राहील, त्यामुळे सामाजिक, सांस्कृतिक यांसारखे मानवी जीवनाचे इतर महत्त्वाचे पैलू दुर्लक्षित राहतात, असे ते आक्षेप आहेत. जे डब्लू, थॉमसन यांना रांकेने केलेला शास्त्रीय इतिहासलेखनाचा दावा समर्थनीय वाटेत नाही. एडवर्ड कार यांनाही शास्त्रीय पद्धतीचा वापर करून ऐतिहासिक पूर्ण सत्य हाती येते ही रांकेची भूमिका मान्य नाही. चार्लस् बीअर्ड देखील "एकोणिसाव्या शतकातील एक सर्वाधिक पक्षपाती इतिहासकार" म्हणून रांकेची संभावना करतात.

गूच यांनी मात्र, इतिहासलेखनात प्राथमिक व समकालीन स्त्रोतसाधनांवर रांकेने दिलेला भर, ऐतिहासिक साधनांच्या तपासणीची त्याने पुरस्कृत केलेली शास्त्रीय पद्धती, सत्याचा शोध घेण्यासाठी त्याने वापरलेले तंत्र आणि इतिहासलेखनात सत्यदर्शनाचा त्याने धरलेला आग्रह हे इतिहास लेखनपद्धतीला रांकेने केलेले मौलिक योगदान होते, असे मत मांडले आहे. ह्या दृष्टीने रांकेचा उल्लेख 'आधुनिक इतिहासलेखन शास्त्राचा जनक' असा केला जातो. इतिहास पूर्णतः भौतिक शास्त्रासारखी ज्ञानशाखा नसली तरी, त्याचा अभ्यास शास्त्रीय पद्धतीने करून सत्याचा शोध घेता येतो, किंबहुना तसा घेणे हे इतिहास अभ्यासकाचे कर्तव्य आहे, इतिहास ही एक स्वायत्त ज्ञानशाखा असून तिच्या अध्ययनाची निश्चित उद्दिष्टे आहेत व विशिष्ट निर्धारित तंत्र आहे, असे आग्रहाने प्रतिपादन करून रांकेने इतिहासाला दैववादाच्या व गूढवादाच्या चौकटीतून बाहेर काढून त्याला शास्त्रीय ज्ञानशाखेचा दर्जा प्राप्त करून दिला हे नाकारता येत नाही.

**ऑगस्ट कॉम्तचा प्रत्यक्षज्ञानवाद:**

जर्मनीमध्ये लिओपाल्ड रांके ज्या कालावधीतइतिहासलेखनात शास्त्रीय अध्ययन पद्धतीचे महत्त्व व वस्तुनिष्ठता अधोरेखित करीत होता, त्याच सुमारास जर्मनी जवळच्या फ्रान्समध्ये ऑगस्ट कॉम्त (*Auguste Comte)* हा विचारवंत मानवाच्या बौद्धिक विकासाबाबत महत्त्वाचे सिद्धांत प्रतिपादित होता, आणि त्या अनुषंगाने इतिहासलेखनासंबंधी काही प्रमेये मांडीत होता. त्याने मांडलेले विचार 'पॉझिटिविझम' म्हणून ओळखले जातात. 'Positive Philosophy of History' हा शब्दप्रयोग प्रथम कॉम्त याने केला आणि इतिहासाविषयीचे प्रत्यक्षज्ञानाचे तत्त्वज्ञान मांडून रांकेच्या प्रत्यक्षदर्शी इतिहासलेखनपद्धतीत नव्या विचारांची भर घातली.

अठराच्या शतकात भौतिक शास्त्राचा अभ्यास शास्त्रज्ञ मोठ्या प्रमाणावर करीत होते व शास्त्रीय पद्धतींचा वापर करून भौतिक जगातील व्यवहारांचे तोवर असलेले अज्ञान दूर करता येईल, नैसर्गिक शक्तींच्या संचलनाचे कोडे उलगडता येईल असा विश्वास विज्ञानाच्या जगात निर्माण झाला होता. शास्त्रीय अध्ययन पद्धतींचे महत्त्व विचारवंतांच्या मनावर बिंबले होते. याचा प्रभाव मानवी व्यवहारांचे अध्ययन करणाऱ्या तत्त्वज्ञांवरही पडत होता. त्यांपैकी एक ऑगस्ट कॉम्त हा होता. कॉम्त हा व्यवसायाने गणितज्ज्ञ असला तरी प्रसिद्ध फ्रेंच विचारवंत सेंट सीमों याच्या हाताखाली त्याचा सचिव म्हणून त्याने काम केले. त्या काळात शास्त्रीय ज्ञानाने प्रभावित होऊन तो मानवी जीवनाचा विचार करू लागला व त्यातून त्याच्या 'पॉझिटिविझम'चा उदय झाला.

१८३० ते १८५४ च्या दरम्यान मानवाच्या विकासाचा सखोल अभ्यास शास्त्रीय पद्धतीने करून कॉम्तने दोन प्रचंड ग्रंथ प्रकाशित केले. '*The Course of Positivist Philosphy*' हा सहा खण्डात व '*System of Positivist Politics*' हा चार खण्डांत प्रकाशित झाले. ह्या ग्रंथातून त्याने आपल्या प्रत्यक्षज्ञानप्राप्ती संबंधीची उद्दिष्टे व मूलभूत तत्त्वे विशद केली. मानवाच्या बौद्धिक विकासाचा शास्त्रीय पद्धतीने अभ्यास केल्यास त्याच्या तीन अवस्था दिसून येतात. पहिला टप्पा मानवाच्या रानटी अवस्थेचा असून त्याकाळात त्याच्या बुद्धीचा विकास झालेला नसल्यामुळे नैसर्गिक शक्तींच्या व्यवहारांचे, त्याच्या भोवतालच्या भौतिक परिस्थितीचे आकलन करून घेण्यास तो असमर्थ होता. त्यामुळे तो आधिदैविक शक्तीवर विश्वास ठेवीत होता. काही अतिमानवी अदृश्य शक्ती भौतिक जगाचे संचालन करतात अशी त्याची धारणा होती. मात्र भोवतालचे जग जाणून घेण्याची जिज्ञासा त्याच्यात होती. विकासाच्या दुसऱ्या अवस्थेला कॉम्त आध्यात्मिक भूमिकेचा टप्पा म्हणतो. ह्या काळात भोवतालचे विश्व तात्त्विक भूमिकेवरून समजून घेण्याचा प्रयत्न मानवाने केला. परंतु ह्या चिंतनपर भूमिकेतून विश्वाच्या संचलनाचे मर्म तो समजून घेऊ शकला नाही. तिसरा टप्पा ही मानवाच्या बौद्धिक विकासाची परिणत अवस्था आहे. ह्या टप्प्यात संपूर्ण विश्वाचे, त्यातील मूलभूत तत्त्वांचे तात्त्विक भूमिकेवरून साकल्याने आकलन करण्याचा प्रयत्न बाजूला सारून, सृष्टीतील एकेका घटकाचे स्वतंत्रपणे शास्त्रीय पद्धतीने आकलन करून घेण्याचा, त्यांच्यातील आंतरिक अन्योन्यसंबंध उलगडून ते तर्कनिष्ठपणे समजून घेऊन, त्याच्यातील आंतरिक ऐक्याचे व नियमिततेचे सूत्र समजून घेण्याचा मानव प्रयत्न करतो. ही शास्त्रीय ज्ञानाची, अनुभवसिद्ध प्रयोगांद्वारा मूलभूत सत्याचे आकलन करण्याची अवस्था आहे. ह्या पद्धतीनें भौतिक जगाच्या व्यवहारामागील निश्चित नियम शोधून काढता येतात, हे जग निश्चित नियमानुसार चालत असल्याचे आढळून

येत; व अशा नियमांचा शोध लागला की त्यांचा उपयोग मानवी समाजाच्या विकासासाठी करता येतो- ही कॉम्तच्या 'पॉझिटिव' म्हणजे शास्त्रीय पद्धतीने चिरंतन सत्याचे आकलन करून घेण्याच्या तत्त्वज्ञानाची बैठक आहे.हीच भूमिका मानवी समाजाच्या अध्ययनाला लावता येते; असे कॉम्त प्रतिपादन करतो. शास्त्रीय पद्धतीचा वापर करून ज्याप्रमाणे विश्वाच्या संचलनामागील कायम स्वरूपी नियम शोधून काढता येतात, त्याच पद्धतीचा वापर करून गतकालीन मानवी जीवनाचे अध्ययन करता येईल, आणि त्यासंबंधी सर्वसामान्य नियम शोधून काढता येतील; त्यासाठी गतकालीन घटनांचे शास्त्रीय पद्धतीने विश्लेषण करून व त्यांच्यातील आंतरिक संबंध शोधून काढून मानवी जीवनाबाबत सर्वसामान्य निष्कर्ष काढता येतात, अशी त्याची ठाम भूमिका आहे. अशा अध्ययन पद्धतीचे नामकरण तो 'सायन्य ऑफ सोशॉलॉजी' असे करतो. हा शब्दप्रयोग करून तो इतिहास व समाजशास्त्र यांना एकमेकानजीक आणतो. इतिहासाच्या अभ्यासकाने केवळ गतकालीन सत्य घटनांचा शोध लावणे एवढेच इतिकर्तव्य न मानता, त्या घटनांमागील आंतरिक सूत्र शोधून काढावे, त्यातून सर्वसामान्य नियम शोधावेत, मानवी व्यवहारांचे नियमन करणाऱ्या मूलभूत सूत्रांचा शोध लागला तर त्या आधारे भविष्यात मानवी जीवनाला दिशा देता येईल, म्हणजे मानवी व्यवहाराविषयीचे शास्त्रीय ज्ञान मानवाच्या विकासासाठी, पर्यायाने मानवी समाजाच्या प्रगतीसाठी उपकारक ठरेल अशी 'पॉझिटिविझम' ची तात्त्विक भूमिका आहे. कॉम्तच्या ह्या विचारप्रणालीचा तत्कालीन वैचारिक जगावर खोल परिणाम झाला. मानवी जीवनाशी निगडित असलेल्या ज्ञानशाखांच्या अध्ययनपद्धतीला त्यामुळे नवी दिशा मिळाली. इतिहास व मानवी समाजाच्या शास्त्रीय अध्ययनाची उपयोगिता अधोरेखित झाली.

ऑगस्ट कॉम्तच्या वैचारिक भूमिकेचा अंगिकार इतिहासलेखनाच्या क्षेत्रात एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात लिखाण करणाऱ्या हेन्री थॉमस बकल ह्या इंग्लिश इतिहासलेखकाने केला. दोन खण्डांत लिहिलेला '*History of Civilization in England*' हा त्याचा 'पॉझिटिविस्ट' भूमिकेवरून लिहिलेला प्रसिद्ध ग्रंथ होय. त्याने इंग्लंडच्या संस्कृतीविषयी जास्तीतजास्त माहिती प्राथमिक स्त्रोतसाधनातून संकलित केली, त्याची चिकित्सक छाननी करून सत्याचा शोध घेतला. यासाठी संख्याशास्त्राचाही त्याने वापर केला. मानवी समाजाबाबतचे सत्य जाणून घेण्यासाठी संख्याशास्त्राचा वापर करणारा तो पहिला इतिहासलेखक होता. मानवी व्यवहारात कोणतेच दैवी अगर गूढ तस्व नाही. पद्धतशीरपणे तपासणी केल्यास त्यात काही निश्चित नियम निदर्शनास येतात. मानवी जीवनाचे नियमन करणारी तत्त्वे अदृश्य असली तरी अनाकलनीय नाहीत. आणि त्यांचा उलगडा झाल्यास भविष्यातील मानवी जीवनाबाबत आडाखे बांधणे अशक्य नाही अशी त्याची निःसंदिग्ध भूमिका आहे. याच दृष्टीने 'डोळ्यांना दिसणाऱ्या घटनांचा अभ्यास हा मानव जातीचा खरा इतिहास नाही. त्यातील मूळ प्रवाहांचा, प्रवृत्तींचा बौद्धिक शास्त्रीय पद्धतीने केलेला अभ्यास हा खरा इतिहास आहे' असे विधान तो करतो.

वरील विवेचनाचा मथितार्थ असा की, एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात नीबूर व रांके ह्या इतिहास अभ्यासकांनी तत्कालीन गूढवादी इतिहासलेखनपद्धती नाकारून ऐतिहासिक लेखनासाठी मूळ स्त्रोतसाधनांच्या अभ्यासावर व शास्त्रीय पद्धतीचा वापर करून ऐतिहासिक सत्याचा शोध घेण्यावर, आणि ते सत्य वस्तुनिष्ठरीत्या मांडण्यावर भर दिला. तसेच ऐतिहासिक स्त्रोतातून सत्य शोधून काढण्याच्या शास्त्रीय पद्धती, प्रतिपादित केल्या. इतिहासाचा अभ्यास तेवढ्यापुरता सीमित असावा असे पॉझिटिव तत्त्वज्ञानाचा पुरस्कर्ता कॉम्त मानीत नाही; तर मानवी व्यवहाराच्या शास्त्रीय अध्ययनातून हाती आलेल्या सत्याच्या आधारे त्याबाबत काही सामान्य सिद्धांत शोधून काढता येतील, असा ठाम निष्कर्ष त्याने काढला. ह्या त्याच्या तत्त्वज्ञानाचा प्रभाव मानव्यशास्त्राच्या अध्ययनावर झाला. मानवी जीवनाच्या प्रवाहामागील मूलभूत सूत्रे शोधून काढण्याचा प्रयत्न अभ्यासक करू लागले. त्यात कार्ल मार्क्स, अर्नाल्ड टॉयन्बी यांचा अंतर्भाव होतो. अशाच प्रकारचे शास्त्रीय स्वरूपाचे अध्ययन औद्योगिकीरण, हुकुमशाही, वसाहतवाद, साम्राज्यवाद इत्यादी विषयांचे होऊ लागले.

ऑगस्ट कॉम्त व त्याच्या अनुयायांना इतिहास हे मानव्यशास्त्र असल्यामुळे ते शंभर टक्के शास्त्र मानता येणार नाही, व भौतिकशास्त्राच्या अध्ययनाची पूर्णतः शास्त्रीय पद्धती इतिहास अध्ययनाला लावता येणार नाही याची कल्पना होती. म्हणून ते इतिहासाला शास्त्र म्हणत नाहीत. परंतु निरीक्षण, चिकित्सक विश्लेषण, सत्यासत्याचा निर्णय ह्या पद्धती

सर्व ज्ञानशाखांच्या इतिहासाच्या देखील अध्ययनात वापरता येतात व त्या आधारे सर्वसामान्य निष्कर्ष काढता येतात अशी त्यांची भूमिका आहे. असे करून ते इतिहासाला समाजाच्या शास्त्राचा दर्जा देतात. विसाव्या शतकातील के. आर. पॉपर सारख्या पॉझिटिविस्ट विचारवंतांनी गतकालीन घटनांच्या सत्यशोधनाचे, त्यासाठी शास्त्रीय पद्धतींचा वापर करण्याचे तत्त्व मान्य केले आहे. परंतु मानवी जीवन परिवर्तनीय आहे. त्यामुळे सर्व घटना समान नसतात, काल घडलेली घटना तशीच्या तशी आज घडणार नाही आणि म्हणून त्यातून सर्वसामान्य सिद्धांत शोधणे व मुख्यतः त्या आधारे भविष्याबाबत आडाखे बांधणे तर्काला पटण्याजोगे नाही, गतकालीन अनेक घटनांच्या अध्ययनातून फार तर काही सामान्य निष्कर्ष काढता येतील परंतु त्यांना चिरकालीन स्वरूपाचे मानणे व त्या आधारे भविष्याचा विचार करणे अशास्त्रीय व चुकीचे ठरेल अशी त्यांची भूमिका आहे.

विसाव्या शतकातील रॉबिन कोलिंगवूड व एडवर्ड कार ह्या व्यासंगी विचारवंतांनीही कॉम्तच्या पॉझिटिविस्ट भूमिकेतील उणिवा विशद केल्या आहेत. भौतिक बाबींचा अभ्यास करणाऱ्या शास्त्रीय पद्धती मानवी जीवनाच्या अध्ययनासाठी वापरणे सयुक्तिक नाही, प्रत्येक घटना ही अनन्यसाधारण असते, त्याचा तपशील भिन्न असतो आणि म्हणून काही घटनांवरून सर्वसामान्य निष्कर्ष काढणे चुकीचे ठरेल; असे मत '*Idea of History*' ह्या ग्रंथात कोलिंगवूडने मांडले आहे. 'What is History?' ह्या प्रसिद्ध ग्रंथात एडवर्ड कार यांनी ऐतिहासिक सत्य चिरकालीन स्वरूपाचे नसते, तसेच ते व्यक्तिसापेक्ष असते, सत्य हे बहुआयामी असते, ते सर्व आयाम प्रत्येक अभ्यासकाला दिसतातच असे नाही आणि म्हणून सामान्य सिद्धांत काढणे किंवा संपूर्ण सत्याचे ज्ञान झाल्याचा दावा इतिहासकाराने करणे दिशाभूल करणारे आहे असे प्रतिपादन केले आहे; तसेच पूर्णतः वस्तुनिष्ठ लिखाण अशक्यप्राय असल्याचेही मत प्रदर्शित केले आहे. हे सर्व आक्षेप ध्यानात घेऊनही रांके आणि कॉम्तच्या इतिहासविषयक तत्त्वज्ञानाने इतिहासलेखनाच्या क्षेत्रात क्रांती घडवून आणली, ऐतिहासिक सत्यावर भर दिल्याने इतिहासाला विश्वसनीयतेचा भक्कम आधार मिळाला, मूळ स्रोतांच्या अभ्यासाला, संकलनाला व प्रकाशनाला चालना मिळाली, त्यासाठी सहाय्यक शास्त्रांचा वापर होऊ लागला व त्या शास्त्रांच्या विकासालाही गती मिळाली आणि घटिप्तांमधील परस्परसंबंध उकलून दाखविण्यावर भर दिल्यामुळे इतिहासलेखनात सुसूत्रता व अर्थपूर्णता आली हे सर्व इतिहासलेखनाला प्रत्यक्षवादी तत्त्वज्ञानाचे मौलिक योगदान होते.

## अभिजात मार्क्सवाद (*Classical Marxism*)

मानवी जीवनाच्या वाटचालीचा सखोल अभ्यास करून त्यासंबंधी काही मूलभूत सिद्धांत मांडणारे जे तत्त्ववेत्ते एकोणिसाव्या शतकात उदयाला आले, त्यांच्यात कार्ल मार्क्सला अनन्यसाधारण स्थान आहे. तो एक कुशाग्र बुद्धीचा तत्त्वज्ञ व द्रष्टा शास्त्रज्ञ तर होताच, त्याबरोबरच संपूर्ण मानवजातीच्या कल्याणाचा तळमळीने विचार करणारा व त्यासाठी आवश्यक कृतीचा पुरस्कार करणारा कृतिशील मानवतावादी विचारवंत होता. त्याने शास्त्रीय पद्धतीने मानवी जीवनाच्या अनेक शतकांच्या प्रवाहाचा अभ्यास करून जे मूलभूत तत्त्वज्ञान प्रतिपादित केले, त्याला 'मार्क्सवाद' अशी संज्ञा देण्यात आली. मार्क्सवादाने मानवी जीवनाचे विश्लेषण करण्याचा एक नवा दृष्टिकोण जगाला दिला. त्याच्या ह्या तात्त्विक विवेचनाने वैचारिक विश्वात प्रचंड खळबळ निर्माण केली. जगातील पहिल्या समाजवादी क्रांतीला त्याच्या तत्त्वज्ञानाने प्रेरणा दिली. आजही मार्क्सच्या निधनानंतर, शतक उलटून गेल्यावर देखील त्याच्या तत्त्वाज्ञानाची कास धरून मानवी जीवनाचा अभ्यास विचारवंत करीत आहेत. त्याने प्रतिपादित केलेली मूलतत्त्वे शास्त्रीय पद्धतीच्या भक्कम पायावर आधारलेली असल्यामुळे, त्याने काढलेले निष्कर्ष न पटणाऱ्या बुद्धिवाद्यांनाही मार्क्सवादाला बगल देऊन पुढे जाता येत नाही. तसेच तो केवळ गतकालीन मानवी जीवनाचा अभ्यास करून थांबला नाही तर त्या संदर्भात त्याने वर्तमानाचा अर्थ लावला आणि भविष्यातील सर्वसामान्य मानवांचे जीवन सुखी करण्यासाठी मार्गदर्शन केले. त्याचे मार्गदर्शन विधायक व मूल्याधिष्ठित आहे. दुर्लक्षित व शोषित समाजगटांच्या समस्यांचे निराकरण करण्याचा व त्यांच्या कल्याणाचा मार्ग दाखविणारा तो प्रकाशमय दीप ठरला. या संदर्भातील "पूर्वीच्या तत्त्ववेत्त्यांनी जगाचे केवळ आकलन करून घेण्याचा प्रयत्न केला, परंतु मुख्य मुद्दा आहे तो त्यात परिवर्तन करण्याचा !" (*Previous philosophers*

*have sought only to understand the world, the point is how- ever to change it)* असा विचार त्याने मांडला, म्हणून त्याला 'युगप्रवर्तक' म्हणणे सार्थ ठरते.

## अभिजात मार्क्सवाद (*Classical Marxism)*

मानवी जीवनाच्या वाटचालीचा सखोल अभ्यास करून त्यासंबंधी काही मूलभूत सिद्धांत मांडणारे जे तत्त्ववेत्ते एकोणिसाव्या शतकात उदयाला आले, त्यांच्यात कार्ल मार्क्सला अनन्यसाधारण स्थान आहे. तो एक कुशाग्र बुद्धीचा तत्त्वज्ञ व द्रष्टा शास्त्रज्ञ तर होताच, त्याबरोबरच संपूर्ण मानवजातीच्या कल्याणाचा तळमळीने विचार करणारा व त्यासाठी आवश्यक कृतीचा पुरस्कार करणारा कृतिशील मानवतावादी विचारवंत होता. त्याने शास्त्रीय पद्धतीने मानवी जीवनाच्या अनेक शतकांच्या प्रवाहाचा अभ्यास करून जे मूलभूत तत्त्वज्ञान प्रतिपादित केले, त्याला 'मार्क्सवाद' अशी संज्ञा देण्यात आली. मार्क्सवादाने मानवी जीवनाचे विश्लेषण करण्याचा एक नवा दृष्टिकोण जगाला दिला. त्याच्या ह्या तात्त्विक विवेचनाने वैचारिक विश्वात प्रचंड खळबळ निर्माण केली. जगातील पहिल्या समाजवादी क्रांतीला त्याच्या तत्त्वज्ञानाने प्रेरणा दिली. आजही मार्क्सच्या निधनानंतर, शतक उलटून गेल्यावर देखील त्याच्या तत्त्वाज्ञानाची कास धरून मानवी जीवनाचा अभ्यास विचारवंत करीत आहेत. त्याने प्रतिपादित केलेली मूलतत्त्वे शास्त्रीय पद्धतीच्या भक्कम पायावर आधारलेली असल्यामुळे, त्याने काढलेले निष्कर्ष न पटणाऱ्या बुद्धिवाद्यांनाही मार्क्सवादाला बगल देऊन पुढे जाता येत नाही. तसेच तो केवळ गतकालीन मानवी जीवनाचा अभ्यास करून थांबला नाही तर त्या संदर्भात त्याने वर्तमानाचा अर्थ लावला आणि भविष्यातील सर्वसामान्य मानवांचे जीवन सुखी करण्यासाठी मार्गदर्शन केले. त्याचे मार्गदर्शन विधायक व मूल्याधिष्ठित आहे. दुर्लक्षित व शोषित समाजगटांच्या समस्यांचे निराकरण करण्याचा व त्यांच्या कल्याणाचा मार्ग दाखविणारा तो प्रकाशमय दीप ठरला. या संदर्भातील "पूर्वीच्या तत्त्ववेत्त्यांनी जगाचे केवळ आकलन करून घेण्याचा प्रयत्न केला, परंतु मुख्य मुद्दा आहे तो त्यात परिवर्तन करण्याचा !" (*Previous philosophers have sought only to understand the world, the point is how- ever to change it)* असा विचार त्याने मांडला, म्हणून त्याला 'युगप्रवर्तक' म्हणणे सार्थ ठरते.

**कार्ल मार्क्स :-**

**जीवन व कार्य :-** जर्मनीत ज्या काळात अनेक नवे विचार उदयाला येत होते, त्या वैचारिक मंथनाच्या काळात १८१८ साली कार्लचा जन्म एका सुखवस्तू ज्यू कुटुंबात झाला.उच्च शिक्षण घेताना इतिहास, भूगोल, कायदा, तत्त्वज्ञान तसाच वाङ्मयाचाही त्याचा व्यासंग होता. कुशाग्र बुद्धीचे देणे लाभलेल्या कार्लची वृत्ती अपारंपरिक होती. मुलाने आपला वकिलीचा व्यवसाय पुढे चालवून सुखी जीवन जगावे, हा पित्याचा व्यवहारी सल्ला ध्येयवादी कार्लला मानवला नाही. तत्त्वज्ञानाच्या अभ्यासात त्याला विशेष रुची होती. विद्यापीठात शिक्षण घेत असताना हेगेलच्या तत्त्वज्ञानाने तो प्रभावित झाला. १८४१ साली जेना विद्यापीठाची आचार्य उपाधी प्राप्त केल्यानंतर बॉन विद्यापीठातील प्राध्यापकाचे पद त्याच्या गैरपारंपारिक विचारामुळे त्याला देण्यात आले नाही. यानंतर त्याने राजकीय व तात्त्विक विषयांवर वृत्तपत्रीय लिखाण सुरू केले. सरकारवर केलेल्या प्रखर टीकेमुळे सरकारचा रोष होऊन त्याला देश सोडावा लागला. पॅरिसमधील वास्तव्यात त्याचे तेथील समाजवादी विचारवंतांशी - फोरिअर, प्रोधोंशी निकटचे संबंध आले. येथेच त्याचा फ्रेडरिक एंजल्स नावाच्या बड्या कारखानदाराच्या ध्येयवादी मुलाशी परिचय झाला. त्या परिचयाचे अल्पावधीत गाढ मैत्रीत रूपांतर झाले. एंजल्सच्या रूपाने त्याला एक निष्ठावान मित्रच नव्हे तर वैचारिक सहकारी लाभला. त्यांची ही मैत्री इतिहास क्षेत्रातील अमोल सृजनशील मैत्री ठरली. जर्मन सरकारच्या दडपणामुळे त्याला फ्रान्सही सोडावे लागले. तेथून तो लंडनला गेला व त्यानंतर सर्व हयात त्याने लंडनला घालविली.

लंडनमधील वास्तव्यात कार्ल मार्क्सच्या वैचारिक लिखाणाला बहर आला. त्यापूर्वी त्याची '*The Holy Family*' व प्रोधाँच्या '*Philosophy of Poverty*' ह्या ग्रंथाला उत्तर म्हणून लिहिलेले '*Poverty of Philosophy*' ही पुस्तके प्रकाशित झाली होती. ह्यांत त्याने पुढे विस्तृतपणे मांडलेल्या इतिहासाच्या भौतिकवादी भाष्याची बीजे निदर्शनास येतात. लंडनला १८४८ साली कम्युनिस्ट लीगच्या पहिल्या अधिवेशनाच्या वेळी कार्लने

एंजल्सच्या मदतीने साम्यवादाचा जाहीरनामा तयार करून साम्यवादाची तात्त्विक बैठक विशद केली. त्यानंतर त्याने भांडवलशाहीच्या शास्त्रीय अध्ययनासाठी ब्रिटिश म्युझियमच्या ग्रंथालयात कित्येक वर्षे घालविली. त्याचे दृश्य फळ म्हणजे 'दास कॅपिटल' *(Das Capital)* ह्या ग्रंथाचा पहिला खण्ड १८६७ मध्ये प्रकाशित झाला, व काही वर्षांच्या अवधीत दुसरा खण्डही लिहून तयार झाला. मात्र पैशाच्या अभावी तो खण्ड त्याच्या हयातीत प्रकाशित होऊ शकला नाही. लवकरच ह्या ग्रंथाचा अनुवाद अनेक युरोपीय भाषांत करण्यात आला. याशिवाय काही फुटकळ लेखही प्रकाशित झाले. उत्पन्नाचे नियमित साधन हाताशी नसल्यामुळे त्याच्या कुटुंबाला सतत दारिद्र्याचा व नानाविध हालअपेष्टांचा सामना करावा लागला. लहान मुलीच्या निधनानंतर तिच्या दफनविधीसाठी लागणारे दोन पौंडही त्याच्या पत्नीला उधार मागावे लागले. असा आत्यंतिक अडचणीचा काळ एंजल्सच्या आर्थिक मदतीमुळे काहीसा सुसह्य झाला. मात्र कार्लची हयात १८८३ सालच्या त्याच्या मृत्यूपर्यंत दारिद्र्याशी व दम्याशी झगडण्यात गेली. एक युगप्रवर्तक तत्त्वज्ञ म्हणून त्याला मान्यता लाभली ती देखील मृत्यूनंतरच !

अभिजात मार्क्सवाद (Classical Marxism) म्हणजे काय? कार्ल मार्क्स आणि फ्रेडरिक एंजल्स यांनी प्रतिपादित केलेले मूळ स्वरूपातील तत्त्वज्ञान अभिजात मार्क्सवाद म्हणून ओळखले जाते. ह्या तत्त्वज्ञानाचे तीन मुख्य आधार आहेत. ते म्हणजे मानवी समाजाच्या विकासाचा लावलेला भौतिकवादी अन्वयार्थ, ह्या भौतिकवादी भाष्यासाठी त्याने वापरलेला विरोधविकासवादाचा सिद्धांत आणि शास्त्रीय समाजवादाच्या तत्त्वाचे प्रतिपादन ! त्याच्या ह्या तात्त्विक प्रतिपादनावर ऑगस्ट कॉम्त, डार्विन व हेगेलच्या तत्त्वज्ञानाचा प्रभाव निदर्शनास येतो. कार्ल मार्क्स हा मानवी समाजाच्या विकासाचा अभ्यास करणारा पहिला विचारवंत नव्हता. त्याच्यापूर्वी डार्विनने मानवाच्या उत्क्रांतीचा विचार मांडला होता, तो मार्क्सने समाजाच्या विकासासंबंधात वापरला. भौतिक शास्त्राच्या अध्ययनाची शास्त्रीय पद्धती मानवी समाजाच्या अध्ययनासाठी वापरता येते व त्यातून काही सर्वसामान्य नियम शोधून काढता येतात, ह्या कॉम्तच्या प्रमेयांचा .आधार घेऊन मार्क्सने मानवी समाजाच्या उदयापासून तो एकोणिसाव्या शतकापर्यंतच्या मानवी इतिहासाचा शास्त्रीय पद्धतीने चिकित्सक अभ्यास केला. अशा अध्ययनासाठी त्याच्या पूर्वी काही वर्षे हेगेलने मानवी समाजाच्या अध्ययनातून उत्क्रांत केलेला इंद्वांत्मक विकासाचा सिद्धांत मार्क्सने स्वीकारला, परंतु मानवी ' जीवनातील चलनामागे - गतिमानतेमागे चित्शक्तीची प्रेरणा असते, एक अतिमानवी अदृश्य चेतनाशक्ती असते ही हेगेलची संकल्पनावादी भूमिका मार्क्सने बाजूला सारली आणि द्वंद्वात्मक विकासाच्या सिद्धांताचा मानवी इतिहासाचे भौतिकवादी भाष्य करण्यासाठी वापर केला. त्याने केलेल्या मानवी इतिहासाच्या भाष्यातूनच त्याचा शास्त्रीय समाजवादाचा विचार उत्क्रांत झालेला आहे. द्वंद्वात्मक विकासाचा सिद्धांत मानवी इतिहासाचा भौतिकवादी अन्वयार्थ लावताना मानवी समाजाच्या विकासात द्वंद्वात्मक विकासाची प्रक्रिया आढळून येते, हे प्रतिपादन अभिजात मार्क्सवादाचा मूलाधार आहे. एक विशिष्ट विचार अगर परिस्थिती अस्तित्वात असते, जोवर तो विचार अगर परिस्थिती मानवी समाजाच्या विकासाला पोषक असते तोवर तो विचार सर्वमान्य असतो, परंतु मानवी जीवन गतिमान असल्यामुळे तो विचार किंवा परिस्थिती कालांतराने विकासाच्या मार्गात बाधा निर्माण करते, कालबाह्य होऊ लागते; अशा वेळी त्याला छेद देणारा विचार पुढे येतो, प्रबळ होऊ लागतो. अशा परिस्थितीत प्रचलित विचार व नवा प्रतिविचार यांच्यात संघर्ष निर्माण होतो. त्या द्वंद्वातून नवा विचार जन्माला येतो; असा नव्या विचाराचा जन्म म्हणजे विकासाचे पुढचे पाऊल असते. त्यातून परिवर्तन घडून येते. मात्र हे परिवर्तन प्रतिगामी स्वरूपाचे नसून प्रगतीच्या स्वरूपाचे असते. ह्या प्रक्रिये बाबत इंग्रजीत Dialectics असा शब्दप्रयोग केला जातो आणि प्रस्थापित विचार, त्याला विरोधी विचार व त्यांच्या संघर्षातून उत्क्रांत होणारा नवा विचार यासाठी thesis, anti-thesis व synthesis असे शब्द वापरण्यात येतात. Dialectics ह्या शब्दाचे मूळ dialogos ह्या ग्रीक शब्दात असून त्याचा अर्थ तार्किक चर्चा अगर वादविवाद असा आहे. विरोधविकास वाद अथवा द्वंद्वात्मक विकासाच्या तत्त्वाचे स्पष्टीकरण एंजल्स याने "*Science of Universal laws of motion and evolution in nature, human society and thought*" असे दिले आहे.

द्वंद्वात्मक विकासाचे तत्त्व दोन गृहीतकांवर आधारलेले आहे. पहिले प्रमेय म्हणजे मानवी जीवन स्थितिशील नसून गतिशील आहे आणि ह्या गतीची चाल विकासाच्या दिशेने होत असते; म्हणजे प्रत्येक नवा टप्पा हा मागील

अवस्थेच्या पुढील विकासाचा टप्पा असतो. दुसरे महत्त्वाचे प्रमेय असे की विकास परस्परविरोधी तत्त्वांच्या संघर्षातून होतो. हा संघर्ष बहिर्गत शक्तींच्या दडपणाखाली अगर प्रभावाने होत नाही, तर तो अंतर्विरोधातूनच निर्माण होतो.

प्रचलित परिस्थितीतील परस्परविरोधी घटकांच्या अंतर्विरोधातूनच संघर्ष निर्माण होतो, असे प्रमेय मांडून मार्क्स हेगेलच्या चित्शक्तीच्या संकल्पनेला छेद देतो. लुडविग फ्युअरबाँख ह्या फ्रेंच तत्त्वज्ञानेही हेगेलचा चित्शक्तीच्या प्रेरणेचा सिद्धात अमान्य केला होता आणि संकल्पनेतून मानवी जीवन निर्माण होत नाही, तर मानवी जीवन विचाराला जन्म देते अशी अनुभववादी (empericist) भूमिका मांडली होती, परंतु मानवी जीवनात कशामुळे, कोणत्या कारकांमुळे परिवर्तन होते याचे स्पष्टीकरण दिले नव्हते. ही उणीव मार्क्सने भरून काढली आणि विकासामागील प्रेरणा भौतिक व्यवहारात शोधली. इतिहासाची भौतिकवादी मीमांसा (Materialistic Interpretation of History):

मानवी समाज निर्माण झाल्यापासून एकोणिसाव्या शतकापर्यंतच्या म्हणजे मार्क्सच्या हयाती पर्यंतच्या मानवी समाजाच्या वाटचालीचे विश्लेषण हा अभिजात मार्क्सवादाचा इतिहासाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा भाग होय. त्याच्या पूर्वी हेगेलने मानवी व्यवहाराच्या विकासाबाबत संकल्पनावादी विचार मांडला होता. तो मार्क्सने अमान्य केला आणि मानवी समाजाच्या सर्व व्यवहारांमागे आर्थिक हेतुमूलकतेचा सिद्धांत आढळून येतो; असा नवा क्रांतिकारी विचार मांडला. यालाच मार्क्सचे इतिहासाचे भौतिकवादी भाष्य (Historical Materialism) असे म्हटले जाते. हा निष्कर्ष मार्क्सने पूर्णतः शास्त्रीय पद्धतीने काढलेला आहे असे ठाम प्रतिपादन लेनिन यांनी केलेले आहे. (Historical Materialism was a great achievement in scientific thinking)

मार्क्सने मानवी इतिहासाच्या केलेल्या विवेचनाचा मुख्य आधार असा की सर्व मानवी व्यवहारांचे मूळ उत्पादन प्रक्रियेच्या स्वरूपात आढळून येते. उत्पादन प्रक्रियेचे स्वरूप मानवी समाजाच्या इतर सर्व घटकांचे स्वरूप निर्धारित करते. उत्पादन प्रक्रियेत सामील असलेल्या सर्व घटकांचे परस्पर संबंध, सामाजिक व्यवहार व संस्था, राजकीय व्यवहार, शासन पद्धती, राजकीय विचार, संस्कृती ह्या सर्वांच्या उगमाचे मूळ उत्पादन प्रक्रियेत आहे. उत्पादन पद्धतीत बदल झाले की त्या पद्धतीशी संबंधित अशा सर्वच घटकात बदल होणे अपरिहार्य असते. मानवाची जाण, त्याचे विचार हे सुद्धा उत्पादन पद्धतीवर अवलंबून असतात. ह्या भूमिकेचे सार असे की, उत्पादन पद्धती ही मानवी जीवनपद्धतीचा पाया आहे व इतर घटक ही त्यावर उभी होणारी इमारत आहे. यालाच मार्क्सचा 'पाया-इमला सिद्धांत' असे म्हणतात. हेगेलने विचार अगर संकल्पना हे मानवी समाजाच्या विकासामागील प्रेरणासूत्र मानले होते; मार्क्स मात्र उत्पादन पद्धतीला मूलाधार मानून त्यातून मानवाची जाण अगर विचार निर्माण होतात असे प्रतिपादन करतो. ह्या संबंधातील 'हेगेल डोक्यावर उभा होता, त्याला मी पायावर उभे केले' हे मार्क्सचे विधान प्रसिद्ध आहे.

**समाजाच्या विकासाच्या अवस्था**

इतिहासाच्या दृष्टीने मार्क्सच्या विचारांचा मागोवा घेता, गतकालीन मानवी समाजाच्या वाटचालीचे शास्त्रीय पद्धतीने विश्लेषण करून, उत्पादन पद्धती हा सर्व मानवी व्यवहाराचा मूलाधार आहे असा नवा क्रांतिकारी निष्कर्ष मार्क्स काढतो. मानवी विकासाच्या प्रक्रियेत तीन अवस्था दिसून येतात - पहिली गुलामगिरी, दुसरी सरंजामशाही व तिसरी भांडवलशाही असे विवेचन तो करतो.

प्रारंभी मानव भटक्या रानटी अवस्थेत असताना प्राथमिक स्वरूपाची साम्यवादी व्यवस्था अस्तित्वात होती. त्यावेळी उत्पादन करण्याची कला त्याला अवगत झाली नव्हती. तो फक्त खाद्य गोळा करणारा होता आणि जे मिळेल ते सर्व एकत्र गोळा करून गटातील सर्वांत विभागून घेतले जात होते. ह्या अवस्थेत मानव गट करून जीवन जगत असला तरी त्याला स्थिर समाजाचे स्वरूप आले नव्हते. हह्या प्राथमिक अवस्थेला 'Primitive communism' असे संबोधण्यात येते.

यानंतर जमिनीतून पीक काढण्याची माहिती माणसाला अवगत झाल्यानंतर शेतीला सुरुवात होऊन मानव स्थिर झाला आणि त्यातून समाज अस्तित्वात आला व सामूहिक मालकी ऐवजी खाजगी मालकीचा विचार उदयाला

आला. तो हेतूपूर्वक उत्पादन करू लागला. प्रथम तो स्वतः राबून उत्पादन करी, परंतु इतरांना कामाला जुंपवून नानाविध कामे करून घेण्यामुळे उत्पादन वाढवता येते हे ध्यानात आल्यावर तो काहींच्या कडून, त्यांना वेठीला धरून अंगमेहनतीची कामे करवून घेऊ लागला. युद्धानंतर पराजित सैनिकांना अशा प्रकारे गुलाम म्हणून वापरण्याची, त्यांच्याकडून अमानुषपणे शारीरिक मेहनतीची कामे करवून घेण्याची प्रथा प्राचीन युरोपात प्रचलित होती. गुलामांना केवळ जिवंत राहण्यासाठी आवश्यक तेवढी सोय करून देऊन, त्यांच्या श्रमशक्तीचा जास्तीत जास्त वापर उत्पादन वाढविण्यासाठी त्यांचे मालक करून घेऊ लागले. यातून उत्पादन वाढले खरे व ह्या पद्धतीने मानवी समाजाने विकासाचा एक टप्पा गाठला देखील ! परंतु ह्या पद्धतीने दोन वर्ग निर्माण केले. एक उत्पादनाच्या साधनांची मालकी असणारा आणि दुसरा त्यावर्गाच्या नियंत्रणाखाली राबणारा. ह्या राबणाऱ्या वर्गाच्या श्रमांचा अधिकाअधिक वापर करून उत्पादनाच्या साधनांची मालकी असणाऱ्या वर्गाने उत्पादन वाढविले, परंतु राबणाऱ्याच्या श्रममूल्याचा विहित वाटा त्याच्या हाती न देता त्याचे लाभ स्वतःच्या हाती ठेवून उत्पादनाचे प्रमाण वाढविण्यासाठी त्याचा वापर केला. यातून शोषक व शोषितांचे वर्ग निर्माण झाले. त्यांच्यातील आर्थिक विषमता वाढली. ह्या शोषणाची व त्यातील अन्यायाची जाणीव श्रमिकांना होऊ लागताच गुलामांची बंडे होऊ लागली. म्हणजे प्रचलित उत्पादन पद्धतीला विरोध करणारा विचार निर्माण झाला व त्यांच्या संघर्षातून प्रचलित अवस्था मोडून नवी पद्धती अस्तित्वात आली.

मार्क्सच्या मते दुसरी अवस्था सरंजामशाहीची होती. यात समाज जीवनात सुव्यवस्था' असावी म्हणून एखाद्या प्रदेशाचा अधिकार एका व्यक्तीकडे असे. हा प्रदेश म्हणजे त्याचा सरंजाम होता. शेतीतून उत्पादन काढण्यासाठी शेतीचे लहान लहान तुकडे शेतकऱ्यांकडे सोपविले जात व त्याचा मोबदला त्यांना सरंजामदाराच्या हाती द्यावा लागे. ह्या प्रारंभीच्या अवस्थेत शेतकरी स्वतंत्रपणे आपल्या जमिनीच्या तुकड्यातून पीक काढी. कालांतराने सरंजामदार उत्पादन वाढीसाठी त्यांच्यावर अनेक निर्बंध लादू लागला. त्यांच्या श्रमाचे मूल्य न देता, त्यांच्याकडून बळजबरीने स्वतःच्या जमिनी कसून घेऊ लागला. यामुळे त्याच्या उत्पन्नात भर पडली, शेतकरी मात्र स्वातंत्र्य घालवून बसला व भूदास बनला. अशा प्रकारे सरंजामशाहीत सरंजामदार निरनिराळ्या मार्गांनी शेतकऱ्यांवर नियंत्रण ठेऊन त्यांच्या श्रमाच्या आधारावर आपले उत्पन्न वाढवू लागला. ह्या पद्धतीतील अन्यायाची व शोषणाची जाणीव होताच भूदास व लहान शोषित शेतकरी बंड करू लागले. पुन्हा एकदा उत्पादन पद्धतीवर नियंत्रण असलेला सरंजामदार शोषक वर्ग बनला, श्रमिकांचे शोषण होऊ लागले, ते शोषित बनले व समाज पुन्हा शोषक व शोषित अशा दोन वर्गात विभागला गेला. उत्पादन व वितरण प्रक्रियेत विशिष्ट समान हितसंबंधांची जाणीव होऊन जेव्हा त्यातील घटक एकत्र येतात तेव्हा अशा घटकांचा वर्ग (class) तयार होतो. असा वर्ग तयार होण्यास समान हितसंबंधांची जाणीव निर्माण होणे आवश्यक असते. परस्परविरोधी हितसंबंधातून वर्गकलह निर्माण झाला, वर्गकलहातून वर्गसंघर्ष सुरू झाला व ही सरंजामदारी पद्धती मोडकळीला येऊन त्यातून भांडवलवादाची बीजे रोवली गेली. सरंजामशाहीच्या काळात शेतकरी फावल्या वेळात घरगुती जीवनावश्यक वस्तूंचे उत्पादन करी व वस्तू विनिमयाच्या पद्धतीने वस्तूंची देवघेव होई. कालांतराने समाजाची व्याप्ती वाढली तशी वस्तूंची मागणी वाढली. त्यानुसार उत्पादन वाढले, उत्पादित वस्तू गावांच्या सीमांबाहेर विक्रीसाठी नेणारा व्यापारी वर्ग निर्माण झाला व देवघेवीचा व्यवहार सुलभ व्हावा म्हणून चलनपद्धती अस्तित्वात आली. वस्तूंना मागणी वाढली तेव्हा व्यापारी वर्ग उत्पादकाला कच्चा माल व भांडवल पुरवून उत्पादन वृद्धीला उद्युक्त करू लागले. या प्रक्रियेतून भांडवलवादी व्यापारपद्धती उदयाला आली. मात्र या उत्पादन प्रक्रियेच्या अवस्थेत उत्पादकाचा, कारागि राचा उत्पादित वस्तूंशी प्रत्यक्ष संबंध कायम राहिला. पुढे काळाच्या ओघात वस्तूंच्या वाढत्या मागणीनुसार पुरेसे उत्पादन करणे कारागिरांना अशक्य असल्याचे निदर्शनास येऊ लागले, तेव्हा उत्पादन वाढीसाठी यंत्रांचा शोध लागला; यंत्राचा वापर घराच्या चार भिंतीत शक्य नसल्याने कारखाने आले; त्यासाठी मोठे भांडवल गुंतविणारा वर्ग पुढे आला; तो उत्पादनासाठी कच्चा माल पुरवू लागला व यंत्रे चालविण्यासाठी कामगार नेमू लागला; ह्या प्रक्रियेत सजीव कामगार हा उत्पादन प्रक्रियेतील निर्जीव घटक बनला; यंत्रपद्धतीतील तो एक निर्जीव घटक बनला. त्याच्या कारागिरीचे अगर उत्पादन कौशल्याचे महत्त्व संपले, त्याबरोबर उत्पादनातील त्याचा आनंद लोपला व त्याचे काम रटाळ, नीरस बनले. ह्या औद्योगिक उत्पादन प्रक्रियेतील तीन महत्त्वाचे घटक कच्चा माल, यंत्रसामग्री व कामगार भांडवलदाराच्या अधीन झाले. यांचा वापर तो उत्पादनावर अधिकाधिक नफा मिळविण्यासाठी करून घेऊ लागला व आलेला नफा भांडवलाच्या

रूपाने उत्पादनवृद्धीसाठी गुंतवू लागला. वस्तूंच्या उत्पादनासाठी आलेला वास्तविक खर्च आणि त्या वस्तूंचे बाजारमूल्य यांतील तफावत हा त्याचा नफा होता आणि हा नफा मिळविणे व तो वृद्धिंगत करणे हा उत्पादन प्रक्रिये मागील त्याचा मूळ उद्देश होता. भांडवलदाराला मिळणाऱ्या अशा नफ्याचे स्पष्टीकरण मार्क्स अतिरिक्त मूल्याच्या सिद्धांताद्वारे (surplus value) देतो. कच्चा माल व यंत्राची किंमत वजा केल्यानंतर उत्पादित वस्तूचे मूल्य कामगाराच्या श्रममूल्यावर आधारित असते. म्हणजे एखाद्या उत्पादित वस्तूचे उत्पादन मूल्य १०० रु. असेल आणि ती वस्तू बाजारात १००० रुपयाला विकली जात असेल तर ह्या दोहोतील तफावत म्हणजे ९०० रुपये ही कामगाराच्या मोबदला न मिळालेल्या श्रमाची किंमत असते. कामगाराने आपल्या श्रमशक्तीने उत्पादित केलेल्या वस्तूचे बाजारमूल्य त्याला दिलेल्या वेतनाहून अधिक असते. याचा अर्थ असा की कामगाराच्या अतिरिक्त श्रमशक्तीचे मूल्य म्हणजे भांडवलदाराचा नफा होय. अशा अतिरिक्त श्रमातून (surplus Labour) उत्पादित झालेल्या मूल्यावर वस्तुतः त्याचा अधिकार असायला हवा, परंतु भांडवलदार तो पूर्णतः स्वतःच्या हाती ठेवतो आणि अशा प्रकारे कामगाराचे शोषण करतो. वस्तूच्या उत्पादनासाठी लागणाऱ्या आवश्यक तेवढ्याच श्रमाचे मूल्य वेतनाच्या रूपाने कामगाराला दिले जाते, अतिरिक्त श्रमातून म्हणजे मोबदला न दिलेल्या त्यांच्या श्रमातून अतिरिक्त उत्पादन होते व त्यातून अतिरिक्त मूल्य निर्माण होते. ही प्रक्रिया म्हणजे कामगारांच्या शोषणाची सतत चालणारी प्रक्रिया होय, असे विवेचन मार्क्स करतो. भांडवलदारांनी चालविलेल्या शोषणाची जाण श्रमिकांना झाली की तो वर्ग आपल्या न्याय्य हक्कांसाठी संघर्षाला सिद्ध होतो. संघटित लढ्यासाठी कामगार संघ स्थापन होतात. भांडवलदार वर्ग व कामगार वर्ग यांच्यात वर्गसंघर्ष सुरू होतो. ह्या भांडवलशाही उत्पादनाच्या अवस्थेत अधिकाधिक नफा मिळविण्यासाठी नव्या नव्या बाजारपेठा हस्तगत करण्याचा प्रयत्न उत्पादनाच्या साधनांची मालकी असणारा भांडवलदार वर्ग करतो. व यातूनच वसाहतवाद व साम्राज्यवादाचा उदय होतो. ह्या वर्गसंघर्षात भांडवलदारांना राज्यशासनाची साथ मिळते. त्यामुळे ते कामगार वर्गाचे अनिर्बंधपणे शोषण करू शकतात. शोषणाविरुद्ध कामगारांचे संप, उठाव होतात. ताळेबंदाचा वापर भांडवलदार करतात, तेजी-मंदीचे अनिष्ट चक्र सुरू होते. उत्पादन प्रक्रियेत बाधा निर्माण होऊ लागते आणि प्रस्थापित भांडवलवादी पद्धतीविरुद्ध श्रमजीवी वर्ग संघर्ष करतो. ह्या संघर्षात प्रस्थापित व्यवस्थेला लोकमान्यतेचा आधार मिळवून देणारा बुद्धिवंतांचा एक वर्ग असतो. औद्योगिक विकासाच्या प्रक्रियेत मध्यम वर्गही उदयाला येतो. त्यातील काही बुद्धिवंतांना ह्या वर्गसंघर्षातील मर्म ध्यानात येते. श्रमिकांच्या होणाऱ्या शोषणाची, त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाची जाणीव होते. व त्याला विरोध करणारे नवे विचार जन्माला येतात, ते श्रमिक वर्गाच्या संघर्षाला तात्त्विक आधार देतात, व कामगार वर्गाला क्रांतीसाठी उद्युक्त करतात. मार्क्सने केलेले ह्या अवस्थेपर्यंतचे विवेचन म्हणजे मानवी इतिहासाचे त्याचे भौतिकवादी भाष्य आहे.

**समाजवादाचा उदय :-**

आपल्या भौतिकवादी शास्त्रीय विवेचनाच्या आधारे मार्क्स भविष्याच्या क्षेत्रात शिरतो आणि भविष्याबाबत सिद्धांत मांडतो. तो समाजवादाच्या उदयाचा सिद्धांत होय. भांडवलशाहीविरुद्ध क्रांती करून श्रमिक वर्ग त्या उत्पादन पद्धतीचा नाश करेल व उत्पादनाची साधने व प्रक्रिया आपल्या हाती घेईल. त्यावर कामगार वर्गाची सत्ता स्थापना होऊन कामगार वर्गाची हुकुमशाही (Dictatorship of the Proletariat) स्थापन होईल. मात्र ही अवस्था अल्पकालीन असेल. ती भांडवलशाही उत्पादन व्यवस्थेकडून समाजवादी उत्पादन व्यवस्थेकडे जाण्याची अनिवार्य संक्रमणावस्था आहे, पहिली पायरी आहे. अल्पावधीत ती अवस्था संपून उत्पादन प्रक्रिया समाजाच्या मालकीची होईल. उत्पादनाची संपूर्ण प्रक्रिया व वितरणाची व्यवस्था समाजाच्या हाती येईल. ह्या व्यवस्थेत समाजातील प्रत्येक घटकाच्या गरजा पुरविल्या जातील. व्यक्ती ही समाजाची अभिन्न घटक असल्यामुळे ती उत्पादन प्रक्रियेचा अविभाज्य घटक राहील. समाजच उत्पादक व समाजासाठी उत्पादन ह्या प्रक्रियेत खासगी मालकी व खासगी नफा ह्या संकल्पना तसेच परस्परविरोधी हितसंबंधाचे वर्ग उरणार नाहीत. वर्गविहीन समाज (classless society) अस्तित्वात येईल. संघर्षच न उरल्यामुळे दण्डात्मक स्वरूपाच्या राज्ययंत्रणेची गरज उरणार नाही. दण्डात्मक राज्य ही संकल्पना नष्ट होईल, शोषक वर्गाच्या हितरक्षणासाठी नियम, कायदे, पोलीस व्यवस्था, न्याय व्यवस्था, धर्म इत्यादींचा वापर केला जात होता, तो बंद होईल. (the state will wither away) व संपूर्ण समाजाच्या कल्याणाचे उद्दिष्ट असलेली सामूहिक समाजसत्ता, लोकसत्ता

अस्तित्वात येईल. भांडवलवादी व्यवस्थेत निर्माण झालेला श्रमिकांचा आत्मदुरावा (alienation) नाहीसा होईल, ह्या नव्या मनुनुसार नवी मानववादी संस्कृती जन्माला येईल. अशी वर्गरहित, शोषणरहित समाजव्यवस्था अस्तित्वात येईल हे मार्क्सचे स्वप्न नाही, तर मानवी समाजाच्या एकोणिसाव्या शतकापर्यंतच्या विकासाचे त्याने जे शास्त्रीय विश्लेषण केले त्यातून निघालेला तो शास्त्रीय निष्कर्ष आहे, म्हणून एंजल्स त्याला 'शास्त्रीय समाजवाद' (scientific socialism) म्हणतो. विचार मांडणारा कार्ल मार्क्स हा पहिला विचारवंत द्रष्टा होता असे नव्हे.

समाजवादाचा त्याच्या पूर्वी सेंट सीमाँ, फोरियर, रॉबर्ट ओवेन इत्यादींनी समाजवादाची संकल्पना मांडली होती. ओवेनने तर त्याचा व्यावहारिक प्रयोगही केला होता. परंतु त्यांची समाजवादाची संकल्पना आदर्शवादी, स्वप्नाळू (utopian) समाजवादाची होती. त्याला शास्त्रीय विचारपद्धतीचा आधार नव्हता. मार्क्सने विरोधविकासवादाच्या सिद्धांताच्या आधारे सामाजिक क्रांतीचा व समाजवादाच्या उदयाचा विचार मांडला. ते उद्दिष्ट साध्य करण्यासाठी संघटित कामगारशक्तीची निकड ओळखून जगातील सर्व कामगारांना संघटित होण्याचे कळकळीचे आवाहन केले. (Workers of the World unit) त्या संघटित शक्तीला वैचारिक मार्गदर्शन करण्यासाठी साम्यवादी पक्षाच्या स्थापनेत पुढाकार घेतला आणि भांडवलशाहीच्या पतनानंतर प्रथमतः येणारी कामगारवर्गाची हुकुमशाही हे साध्य नसून सामाजिक सत्ता स्थापन होण्याचे ते साधन आहे हे स्पष्ट केले. 'मार्क्सने प्रतिपादित केलेला समाजवाद एकाधिकारशाही स्वरूपाचा नव्हे तर लोकशाही स्वरूपाचा आहे' हे सिडने कुक या विचारवंताने आपल्या 'Scope of Marxism' ह्या ग्रंथात केलेले विधान लक्षणीय आहे. 'Civil War in France' ह्या पुस्तिकेत तसेच 'साम्यवादाचा जाहीरनामा' यात हे विचार त्याने स्पष्टपणे मांडले आहेत. तो म्हणतो की, 'माझ्या शास्त्रीय विवेचनात मी तीन मुद्दे प्रतिपादित करण्याचा प्रयत्न केला आहे. १) उत्पादन विकासाच्या प्रक्रियेशी वर्गाची निर्मिती व अस्तित्व निगडित आहे. २) वर्गसंघर्षातून कामगारवर्गाच्या हुकुमशाहीची परिणती अनिवार्य आहे आणि ३) ही हुकुमशाहीची अवस्था अल्पकालीन असून त्यातून सर्व वर्गभेद नष्ट होतील, वर्गसंघर्ष संपेल, वर्गविहीन समाज अस्तित्वात येईल व मानव खऱ्या अर्थाने मुक्त होईल. एंजल्सने देखील आपल्या 'Socialism, Utopian and Scientific' ह्या ग्रंथात क्रांतीनंतर अस्तित्वात येणाऱ्या समाजव्यवस्थेचे असेच स्पष्टीकरण दिले आहे व मार्क्सचे दुर्बोधरीत्या मांडले गेलेले विचार त्याने सोप्या सुटसुटीत शब्दात सुबोध करून मांडले आहेत.

मार्क्सने केलेल्या मानवी इतिहासाच्या भौतिकवादी भाष्याचे महत्त्व अधोरेखित करताना लेनिन म्हणतो की, मार्क्सच्या ह्या प्रयत्नाने इतिहासाच्या अभ्यासकातील दोन त्रुटी दूर केल्या. मार्क्सपूर्वी विचारवंतांनी ऐतिहासिक घडामोडी अभ्यासल्या, परंतु त्यामागील कारणे शोधून काढली नाहीत; आणि दुसरी उणीव म्हणजे जनसामान्यांच्या जीवनाकडे डोळेझाक केली. ऐतिहासिक भौतिकवादाने प्रथमच जनसामान्यांच्या स्थितीचा, त्यात होणाऱ्या परिवर्तनांचा, भौतिक शास्त्राचा अचूक व काटेकोरपद्धतीने अभ्यास केला व त्यातून निष्कर्षरूप विचारसार पुढे ठेवले. 'ऐतिहासिक भौतिकवादी भाष्याची मूलभूत गृहितके दोन विचारांवर आधारित आहेत- पहिला विचार म्हणजे वर्गसंघर्षातून इतिहास घडतो आणि दुसरा, सर्व सामाजिक घटकांच्या संबंधांना भौतिक व्यवहारांचा आधार असतो; माणसाच्या मूलभूत गरजांची परिपूर्ती कोणत्याही संस्थेच्या सामाजिक, राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक स्थापनेपेक्षा महत्त्वाच्या असतात.' असे विधान प्रा. जे. डब्लू. थॉमसन यांनी आपल्या *'History of Historical Writing'* ह्या ग्रंथात केलेले आहे.

**आक्षेप :-**

कार्ल मार्क्सने केलेल्या इतिहासाच्या भौतिकवादी भाष्यावर व समाजवादाच्या उदयाच्या सिद्धांतावर काही मूलभूत आक्षेप विचारवंतांनी घेतले आहेत. त्यांपैकी काही महत्त्वाचे आक्षेप म्हणजे १) उत्पादन प्रक्रिया ही इतर सर्व मानवी व्यवहारांच्या बुडाशी आहे, सर्व मानवी व्यवहार त्यामुळे निर्धारित होतात हे मार्क्सचे भौतिकवादी भाष्य एकांगी आहे. आर्थिक व्यवहारांव्यतिरिक्त इतर अनेक प्रकारच्या प्रेरणा मानवी कृतीला चालना देतात याकडे मार्क्सचे दुर्लक्ष झाले आहे.

२) मानवी संस्कृतीत विचाराला प्राधान्य असते, प्रभावी विचार मानवी जीवनात महत्त्वाची लक्षणीय स्थित्यंतरे घडवून आणतात याची दखल मार्क्स घेत नाही. उलट विचार व संकल्पना देखील आर्थिक पायाच्या इमल्याच्या रूपात असतात असे तो प्रतिपादित करतो.

३) धर्माला 'अफूची गोळी' म्हणून मार्क्स धर्माला नकारात्मक स्थान देतो, हे इतिहासाच्या अध्ययनाने पटण्याजोगे नाही. कारण अनेक महत्त्वाच्या ऐतिहासिक घटनांमागे धार्मिक प्रेरणा प्रभावी असल्याचे निदर्शनास येते उदाहरणार्थ: ११ ते १३ व्या शतकातील धर्मयुद्धे.

४) मार्क्स क्रांती हाच परिवर्तनाचा मार्ग मानतो; प्रत्यक्षात समन्वयवादी भूमिकेतूनही मूलभूत परिवर्तन झाल्याची उदाहरणे इतिहासात आढळतात.

५) 'क्रांतीत कामगारवर्ग आघाडीला असेल' हे मार्क्सचे विधान असत्य ठरल्याची उदाहरणे प्रत्यक्षात निदर्शनास येतात. चीनमधील समाजवादी क्रांती कृषकांच्या पुढाकाराने झाली.

६) भांडवलशाही व्यवस्थेत मार्क्स केवळ भांडवलदार व कामगार वर्गाचा विचार करतो, मध्यम वर्गाचा विचार करीत नाही.

वरील आक्षेपांपैकी काहींची उत्तरे मार्क्सच्या 'The Holy Family' व 'The German Philosophy' या प्रारंभीच्या लिखाणात सापडतात, तर काहींचे स्पष्टीकरण मार्क्सने ज्या काळात आपले लिखाण केले त्या काळात शोधावे लागते.

**मूल्यमापन :-**

उत्पादन प्रक्रियेतील बदल सर्व मानवी व्यवहार निर्धारित करतात असे प्रतिपादन करून मार्क्सने मांडलेला आर्थिक हेतुमूलकतेचा सिद्धांत अनेक समीक्षकांना एकांगी वाटतो. परंतु हे विवेचन एकांगी नसून त्याद्वारा तोवर दुर्लक्षित राहिलेल्या मानवी जीवनाच्या वास्तवावर त्याने नेमके बोट ठेवले आहे. आर्थिक व्यवहार ही मानवी व्यवहारांना निर्धारित करणारी एकमेव नसली तरी अतिशय महत्त्वाची बाब आहे याविषयी आज दुमत नाही. चार्लस बिअड सारखा अमेरिकन इतिहासकार देखील, 'इतिहासाच्या क्षेत्रात मार्क्सवादाने इतिहासकारांचे लक्ष राजकीय अगर राजनैतिक विषयाकडून अधिक चिरंतन व मूलभूत विषयांकडे वळविले' असल्याचे मत व्यक्त करताना दिसतो. शिवाय मार्क्सने मानवी समाजाच्या विकासाची भौतिकवादी दृष्टिकोणातून मीमांसा केली, याचा अर्थ त्याने सामाजिक व वैचारिक अंगांचे महत्त्व जाणले नव्हते असे नव्हे. '*Thesis on Feuerbach*' मध्ये मार्क्सने सामाजिक स्थितीचा मानवावरील प्रभाव अधोरेखित केला आहे. (*Man exists in society, he is the product of society and a product of a definite form of society)* तसेच 'The Holy Family' यात तो मानवाच्या विकासाचे विवेचन करताना मानवी समाजाची जाण व विचार यांच्या विकासाचे व महत्त्वाचेही विवेचन करतो. मात्र त्याने भांडवलशाही वरील आपल्या ग्रंथात व इतरत्र केलेले इतिहासाचे भौतिकवादी भाष्य इतके वेगळे, अपारंपारिक व प्रभावी होते की त्याच्या पूर्वीच्या लिखाणातील प्रतिपादनाकडे समीक्षकांचे त्यावेळी लक्ष गेले नाही; त्याच्या कट्टर अनुयायांनीही भौतिकवादी भाष्यावरच भर दिला. त्यामुळे मानवी समाजाचे त्याने 'The Holy Family' अथवा 'The German philosophy' ह्या लिखाणात केलेले विवेचन अनेक वर्षे दुर्लक्षित राहिले. पहिल्या महायुद्धानंतर आलेल्या अन्तोनिओ ग्रामची सारख्या अभ्यासकांनी मात्र त्या पैलूकडे लक्ष वेधले. "मार्क्स ऐतिहासिक मीमांसेत भौतिकवादाला प्राधान्य देत असला तरी तो मानवी मन आणि अंतःप्रेरणा अमान्य करीत नाही" असे विधान आचार्य जावडेकरांनी 'मार्क्सवाद' ह्या पंडित मुंडले यांच्या ग्रंथाच्या प्रस्तावनेत केलेले आढळते.

मार्क्स धर्माला 'अफूची गोळी' असे म्हणून त्याज्य मानतो, याचा अर्थ धर्माच्या मूलतत्त्वांना तो नाकारतो असा नसून, अनेक शतके धर्माचा वापर ज्या अयोग्य, अनिष्ट प्रकारे केला जात होता, समाजाची स्वतंत्र विचारशक्ती खच्ची

केली जात होती, प्रस्थापित व्यवस्था कायम टिकविण्यासाठी धर्मसंस्था धर्माचा गैरवापर करीत होत्या त्याला मार्क्सचा आक्षेप होता, आणि कोणतीही विवेकवादी व्यक्ती ही भूमिका अमान्य करणार नाही.

मार्क्सने दोनच वर्ग मानले, मध्यम वर्गाकडे दुर्लक्ष केले हा आक्षेप सत्याधिष्ठित नाही. मध्यम वर्गाचे उल्लेख त्याच्या लिखाणात अनेक ठिकाणी येतात आणि ह्या वर्गातील बुद्धिवंत क्रांतीचे वैचारिक नेतृत्व करतील असे तो म्हणतो. मार्क्सने केलेली काही भाकिते काळाच्या ओघात खरी ठरली नाहीत. उदाहरणार्थ; क्रांतीत कामगारवर्ग आघाडीला असेल, किंवा क्रांती हिंसक मार्गाने होईल, हे वास्तव आहे याबद्दल वाद नाही. परंतु ज्या परिस्थितीत त्याने ही भाकिते केली, त्या परिस्थितीतून त्याने हे निष्कर्ष काढले. मात्र ही विधाने मार्क्सवादी तत्त्वज्ञानाचे अविभाज्य घटक नाहीत. इतिहासाच्या दृष्टीने मार्क्सने केलेले इतिहासाचे भौतिकवादी भाष्य हे मौलिक स्वरूपाचे योगदान आहे. मॅक्स वेबर सारख्या विसाव्या शतकातील सुप्रसिद्ध समाजशास्त्रज्ञानेही मार्क्सवादाचे ऋण मान्य केले आहे. हरॉल्ड लास्की ह्या ख्यातनाम ब्रिटिश तत्त्वज्ञाला व मॅक्स ईस्टमन ह्या समाजशास्त्रज्ञाला मार्क्सचा क्रांतीचा मार्ग अव्यवहार्य व अप्रयोजक वाटला तरी मार्क्स हा सामाजिक न्यायाची तळमळ असलेला अद्वितीय

युगपुरुष होता असे मत '*Essays on Marx*' ह्या लेखनसंग्रहात त्यांनी व्यक्त केले आहे. लास्की म्हणतो. "*He founded both a science and an ideal. At bottom the main passion by which he was moved was a passion for justice*" मार्क्सने केलेल्या मानवी इतिहासाच्या भौतिकवादी भाष्याने, तो रूढार्थाने इतिहासकार नसला तरी, इतिहासाच्या अभ्यासाला नवी दिशा दिली. मानवी जीवनातील आर्थिक अंगाचे महत्त्व अधोरेखित करून आर्थिक व सामाजिक इतिहासलेखनाची नवी दालने खुली केली. शास्त्रीय पद्धतीने मानवी व्यवहारांचा विचार करण्यास पुढील पिढ्यांना प्रवृत्त केले. केवळ वर्णनात्मक स्वरूपाच्या राजकीय व राजनैतिक इतिहासलेखनाच्या कक्षेतून, तसेच ईश्वरवादी दृष्टिकोणातून इतिहासाला बाहेर काढले आणि तोवर कोणत्याही इतिहासकाराने न अंगिकारलेल्या नव्या व्यावहारिक भौतिक पातळीवरून मानवी व्यवहारांचे शास्त्रीय विश्लेषण करून इतिहासलेखनाची कक्षा व्यापक केली. त्याच्या लिखाणाने प्रभावित होऊन जगातील रशिया, चीन सारख्या मोठ्या राष्ट्रांत समाजवादाचा प्रयोग झाला. रशियातील समाजवादी सत्तेचा अंत झाल्यानंतर 'समाजवाद संपला, एवढेच नव्हे तर मार्क्सवादाचा अंत झाला' अशी विधाने करण्यात येत असला, तरी अभिजात मार्क्सवादाच्या मूलभूत तत्त्वांचे व त्याच्या काही वर्षे दुर्लक्षित राहिलेल्या लिखाणाचे सखोल अध्ययन विचारवंत करीत आहेत. मार्क्सवादाचा व्यावहारिक पातळीवरील प्रयोग आणि मार्क्सवाद ह्या दोन बाबी भिन्न आहेत. अभिजात मार्क्सवाद हा एक विचार आहे, एक विशिष्ट सैद्धांतिक दृष्टिकोण आहे, मानवी समाजाच्या विश्लेषणाची ती एक शास्त्रीय पद्धती आहे आणि तेच अभिजात मार्क्सवादाचे इतिहासलेखनाला चिरंतन स्वरूपाचे योगदान आहे. विसाव्या शतकात ॲनल्स, संपूर्ण इतिहास, सबार्टन या सारख्या इतिहासलेखनप्रवाहावर तसेच आधुनिक समाजशास्त्रज्ञांवरही मार्क्सवादाचा प्रभाव असल्याचे निदर्शनास येते.

**ॲनल्स (Annales)**

विसाव्या शतकात इतिहासलेखन क्षेत्रामध्ये जे नवे प्रवाह रूढ झाले, त्यांपैकी एक महत्त्वाचा प्रवाह ॲनल्स या नावाने ओळखला जातो. ह्या प्रवाहाचा उगम फ्रान्समध्ये झाला. त्याचे प्रवर्तक फ्रेंच विद्यापीठात कार्यरत असलेले व्यासंगी इतिहासलेखक होते. विसाव्या शतकाच्या तिसऱ्या दशकात जन्माला आलेल्या ह्या प्रवाहाची दखल कित्येक वर्षे बाहेरच्या जगाने, जवळच्या इंग्लंडने देखील घेतली नाही. दुसऱ्या महायुद्धानंतर मात्र, केवळ युरोपमधीलच नव्हे तर जगाच्या इतर भागातील इतिहासलेखन ह्या प्रवाहाने प्रभावित झाल्याचे आढळून येते. 'ॲनल्स' ह्या इंग्रजी शब्दाचा शब्दकोषीय अर्थ वार्षिक नोंदी असा असला, तरी ह्या लेखनप्रवाहाला तो अर्थ अभिप्रेत नाही. इतिहासलेखनाविषयीचा एक नवा दृष्टिकोण, नवी भूमिका जाणीवपूर्वक घेऊन ह्या प्रवाहाने १९२९ साली मूर्त रूप घेतले. 'Annales d'historie economique et sociale' ह्या शीर्षकाखालील नियतकालिकाचा पहिला अंक पॅरिस येथे १९२९ साली प्रकाशित झाला. मार्क ब्लॉच (Marc Bloch) आणि लुसियन फात्रे (Lucien Febvre) हे दोघे तोवर प्रसिद्धीस आलेले इतिहासलेखक

ह्या नियतकालिकाचे संपादक होते. १९४७ साली ह्या नियतकालिकाने काहीसे वेगळे शीर्षक घेतले. ते म्हणजे 'Annales : Economic, Societie and Civilization' आणि पुढे १९९४ साली त्यात थोडा बदल करून 'Annales, Historie, Sciences Sociales' असे त्याचे नामकरण करण्यात आले. शीर्षकात झालेल्या बदलावरून ॲनल्सच्या दृष्टिकोणात झालेल्या परिवर्तनाची कल्पना येते.

**ॲनल्सची तात्त्विक भूमिका :-**

हे नियतकालिक सुरू करण्यामागील संस्थापकांची भूमिका त्याच्या पहिल्या अंकाच्या प्रस्तावनेत लुसियन फात्रेने स्पष्ट केली. त्यात तो लिहितो की, तोवरच्या इतिहास अभ्यासकांनी गतकालीन मानवी जीवनाच्या एखाद्याच पैलूचा विशेष अभ्यास केला, त्यामुळे इतिहासविषयाला एकांगी रूप आले; विशिष्ट पैलूंचा अभ्यास करण्याची पद्धत रूढ झाल्यामुळे मानवी जीवनाचे चित्रण कप्प्याकप्प्यात विभागले. मानवी जीवनाचा एकजिनसीपणा त्यातून व्यक्त होत नाही. मानवी जीवनाचे सर्वंकष दर्शन घडविण्यास हा इतिहास कुचकामी ठरतो; याशिवाय इतिहास ही एक स्वायत्त ज्ञानशाखा मानली गेल्यामुळे मानवी जीवनाचा अभ्यास करणाऱ्या इतर ज्ञानशाखांपासून ती विलग झाली, यामुळे इतिहास व इतर मानव्यशास्त्रांमध्ये भक्कम भिंती उभ्या झाल्या. मानवी जीवनाचे, मानवी समाजाच्या सर्व अंगांचे संपूर्ण चित्रण करण्यास असा इतिहास असमर्थ ठरतो. अशा पारंपारिक इतिहासाची चौकट मोडून इतिहासाचे घटनाधिष्ठित स्वरूप बाजूला सारून इतिहासातून गतकालीन मानवी समाजाचे संपूर्ण चित्रण करणे व मानवीय विज्ञानाचे रूप देणे निकडीचे आहे. यासाठी इतिहासाशी निगडीत असणाऱ्या समाजशास्त्र, अर्थशास्त्र, भूगोल इत्यादी ज्ञानशाखांचा अभ्यास करणे, त्यांचा आशय व संशोधन पद्धतींचा वापर इतिहासाच्या अध्ययनासाठी करून घेणे अगत्याचे आहे; थोडक्यात, इतिहासाला मानवी समाजाच्या सर्वांगीण व सर्वंकष अध्ययनाचे शास्त्र (science of humanity) बनविणे निकडीचे आहे. इतिहासाबाबतची ॲनल्स गटाची ही भूमिका 'संपूर्ण इतिहास' (Total His- tory) म्हणून इतिहासक्षेत्रात ओळखली जाते. ही भूमिका घेणारे व त्या अनुसार लेखन करणारे इतिहासकार ॲनल्स गटात (Annales school) मोडतात.

लुसियन फाब्रेने प्रतिपादित केलेल्या इतिहासविषयक भूमिकेने तोवर रूढ असलेल्या इतिहासलेखनाला आव्हान दिले. तोवरच्या इतिहासलेखनाचा आशय व पद्धती याविरुद्ध त्यांनी रणशिंग फुंकले. लिओपोल्ड रांकेने पुरस्कृत केलेल्या प्रत्यक्षवादी इतिहासलेखनाविरुद्धची ही निःसंदिग्ध प्रतिक्रिया होती. मूळ स्रोतातून गतकालीन वास्तवाचे जे सत्यदर्शन घडेल, तेवढाच इतिहासकाराने आपल्या लिखाणाचा आधारा मानावा; लिखित पुराव्या पलीकडे इतिहासकाराने दृष्टी टाकू नये, सत्यदर्शन हेच इतिहासकाराचे पवित्र कर्तव्य व नैतिक उत्तरदायित्व आहे अशी प्रत्यक्षवादी इतिहासलेखनाची ठाम भूमिका फ्रान्समध्येही प्रचलीत झाली. यामुळे मूळ साधनांतून आढळणारे केवळ राजकीय, राजनैतिक व लष्करी विषयांचे निवेदन इतिहासकार करू लागले. यामुळे इतिहास एकांगी बनला. गतकालीन मानवी जीवनाचा हा एकच पैलू इतिहासात आढळू लागला. याविरुद्ध ॲनल्सने बंड पुकारले. केवळ राजकीय अगर राजनैतिक घडामोडी म्हणजे मानवी जीवन नाही, मानवी जीवनाचे नानाविध घटक आहेत, ते केवळ परस्परसंलग्न नसून परस्परावलंबी आहेत; मानवी जीवन सेंद्रीय एकात्मतेचे आहे (Organic unity). आणि इतिहास हा गतकालीन मानवी समाजाचा आरसा आहे; म्हणून विभागीकरण (Compartmentalisation) व विशेष पैलूंचा अभ्यास (specialisation) यावर इतिहासलेखनात असलेला भर अयोग्य व अनिष्ट आहे; मानवी समाजाचा संपूर्ण, सर्वांगीण व एकत्रित अभ्यास हे इतिहासाचे उद्दिष्ट असावे; ते उद्दिष्ट साध्य करण्यासाठी इतिहासाने मानवी जीवनाशी संबंधित असलेल्या सर्व ज्ञानशाखांशी संवाद साधावा; त्यांच्या संकल्पना, त्यांचे निष्कर्ष विचारात घ्यावेत; मानवी जीवनाचे समग्र चित्र रेखाटावे; या दृष्टीने एककालिक घटना अगर एखादी व्यक्ती, हा अभ्यासविषय न बनविता एखाद्या प्रदेशात प्रदीर्घ काळात घडणाऱ्या विविध घडामोडी, त्यातील परिवर्तने, परिवर्तन प्रक्रिया, विविध प्रकारच्या समस्या व व्यापक अर्थरचना व समाजरचना यांचा अभ्यास इतिहासकाराने केल्यास मानवी समाजाच्या संपूर्ण इतिहासाचा आलेख तयार होईल, असा इतिहासाकडे पाहण्याचा नवा दृष्टिकोण ॲनल्सने पुरस्कृत केला.

ॲनल्सच्या भूमिकेचा उगम ॲनल्सच्या अभिनव भूमिकेची बीजे ऑगस्ट कॉम्त व एमिल डरखाईम यांनी मांडलेल्या भूमिकेत आढळतात. भौतिक शास्त्रांच्या अध्ययनात वापरली जाणारी शास्त्रीय पद्धती सामाजिक शास्त्रांच्या अध्ययनासाठी वापरता येते व त्याद्वारा भौतिक शास्त्राप्रमाणे सामाजिक शास्त्रातही ठोस निष्कर्ष काढता येतात, ह्या काम्तच्या प्रतिपादनाचा प्रभाव ॲनल्स गटावर दिसतो. त्यांच्या इतिहासविषयक भूमिकेवर एमिल डरखाईम ह्या एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात व विसाव्याच्या पूर्वार्धात लिखाण करणा-या समाजशास्त्रज्ञाचा विशेष प्रभाव पडलेला आढळतो.

**एमिल डरखाईम (Emile Durkheim) :**

हा मुख्यतः समाजशास्त्रज्ञ असला तरी गतकालीन समाजाचा अभ्यास करणारी ज्ञानशाखा म्हणून त्याने इतिहासाचाही विचार केला. समाजशास्त्र व इतिहास ह्या दोन भिन्न विलग ज्ञानशाखा नसून त्या परस्परसंलग्न व परस्परपूरक आहेत; समाजशास्त्रात वापरण्यात येणाऱ्या संशोधनपद्धतींचा वापर इतिहास अध्ययनात करता येतो, त्यामुळे इतिहासात काटेकोरपणा, नेमकेपणा व वस्तुनिष्ठता येईल हे त्याचे पहिले प्रमेय ! त्याचे दुसरे प्रमेय असे की कोणत्याही घटनेचे कारकत्व एका व्यक्तीकडे नसते; व्यक्तीच्या सभोवतालच्या परिस्थितीतील अनेक घटक घटनेला अगर कृतीला जबाबदार असतात; म्हणून कोणत्याही क्षुल्लक किंवा मोठ्या घटनेतील माणसाची कृती एवढाच अभ्यासविषय न मानता, त्या भोवतालच्या परिस्थितीचे सखोल विश्लेषण केल्यास घटनांचा योग्य अर्थ लावता येतो. डरखाईमच्या विचाराचे सार असे की, व्यक्ती कितीही महान असो ती कधीच स्वायत्त नसते. तिची कृती अप्रत्यक्षरीत्या नियंत्रित असते; समाज, जमात, परिसर, भौगोलिक स्थिती, आर्थिक घटक ह्या सर्व गोष्टी माणसाची कृती नियंत्रित करतात; माणूस जन्माला येण्यापूर्वी समाजरचना अस्तित्वात असते, ही समाजरचनेची चौकट त्याला घडवते, त्याच्या व्यक्तित्वाला आकार देते व त्यातूनच कृती होते; म्हणून व्यक्ती अगर घटनेऐवजी मानवी कृतीचा व्यापक व सखोल अभ्यास केल्यास तिचा खरा अर्थ उलगडू शकतो.

एमिल डरखाईमच्या समाजशास्त्रीय विचारांनी फ्रान्समधील विविध ज्ञानशाखांत वैचारिक खळबळ निर्माण केली. हेन्री बर (Henri Berr) हा फ्रेंच इतिहासकार व विचारवंतही त्याने प्रभावित झाला. १८९८ साली त्याने लिहिलेल्या 'Synthesis of Historical knowledge' या ग्रंथावर डरखाईमचा प्रभाव स्पष्ट दिसतो. इतिहासलेखनाबाबतच्या पारंपारिक भूमिकेला छेद देणारे विचार त्याने प्रतिपादित केले. अध्ययनाची शास्त्रीय पद्धती व गतकालीन समाज जीवनाच्या विविध घटकांचा साकल्याने अभ्यास करून त्या ज्ञानाचा समन्वय इतिहासात साधावा; असे मत त्याने आग्रहाने मांडले. भिन्न सामाजिक शास्त्रांच्या अध्ययनातून सामाजिक एकजिनसीपणाचा, मूलभूत ऐक्याचा विचार, विचारवंतांच्या गळी उतरविण्याचा त्याने प्रयत्न केला. प्रारंभी त्याचे विचार पारंपारिक इतिहासकारांना धक्कादायक वाटले. अशा क्रांतिकारक विचारांमुळे त्याला फ्रान्समधील एका प्रख्यात महाविद्यालयातील प्राध्यापकाचे पद नाकारले गेले. मात्र त्याची भूमिका मान्य असलेले अर्थशास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ, मानववंशशास्त्रज्ञ, जीवशास्त्राचे व भूगोलाचे काही अभ्यासक त्याच्याजवळ एकत्र येऊ लागले, चर्चा करू लागले. त्यांनी मानवी जीवनातील भिन्न घटकांमागील मूलभूत ऐक्याच्या सूत्राची जाणीव प्रसृत करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्यात दोन तरुण इतिहासकार मार्क ब्लॉच व लुसियन फाव्रे हे होते. ॲनल्स इतिहासलेखनप्रवाहाच्या मुळाशी असलेली त्यांची वैचारिक बैठक अशा प्रकारे डरखाईम व बरच्या विचारांनी तयार झाली. त्यांनी नव्या पद्धतीने इतिहास लिहिण्याचा एक नमुना ॲनल्स ह्या नियतकालिकाच्या प्रकाशनाने जगापुढे ठेवला. इतिहासलेखन क्षेत्रातील नव्या पर्वाच्या प्रारंभाची ती नांदी होती.

एमिल डरखाईम, हेन्री बर, मार्क ब्लाँच, लुसियन फाने हे सर्व साधारणतः समकालीन होते. डरखाईम हेन्री बर पेक्षा चार वर्षांनी ज्येष्ठ तर फाने हा मार्क ब्लॉचपेक्षा आठ वर्षांनी ज्येष्ठ होता. परंतु त्या दोहोत अभिन्न असे वैचारिक साधर्म्य होते. १९१९ ते १९४४ पर्यंत म्हणजे मार्क ब्लॉचच्या मृत्यूपर्यंत ते दोघे बरोबरीने एकत्र काम करीत होते. त्याचे दृश्य फळ म्हणजे १९२९ साली प्रकाशित झालेल्या ॲनल्स ह्या नियतकालिकाचे नियमितपणे होत गेलेले प्रकाशन हे होय, १९२९ ते १९४२ पर्यंत संपादनाचे कार्य ब्लॉचने, त्यानंतर १९४६ ते १९५६ पर्यंत फाव्रेने व त्यानंतर बरीच वर्षे फर्नाद

ब्रोदेल याने नेटाने केले आणि ॲनल्सचा प्रवाह फ्रान्सबाहेरील युरोपात व अमेरिका खंडातही पोचविला. ॲनल्स हे नियतकालिक सुरू करण्यापूर्वी ब्लाँच व फाव्रे यांनी स्वंतत्रपणे मूलगामी लेखन करून इतिहासकारांच्या वर्तुळात सिद्धहस्त लेखक म्हणून ख्याती मिळविली होती.

**मार्क ब्लाँच (Marc Bloch) :-**

फ्रान्समधील एका ज्यू कुटुंबात १८८६ साली जन्माला आलेल्या मार्कचे वडील एक ख्यातनाम इतिहासकार होते. रोमन इतिहासाचा त्यांचा व्यासंग होता. पॅरिस व बर्लिन विद्यापीठात शिक्षण घेतल्यानंतर पहिल्या महायुद्धाच्या दरम्यान मार्क सैन्यात दाखल झाला. युद्ध संपल्यानंतर स्ट्रासबर्ग विद्यापीठात त्याला प्राध्यापकाचे पद मिळाले. त्यासुमारास त्याचा फाव्रेशी वैचारिक संवाद सुरू झाला. ह्या कालावधीत लिहिलेल्या अनेक लेखांतून समाजाच्या चालीरीती, रूढी, आर्थिक रचना यांचे इतिहासातील महत्त्व त्याने अधोरेखित केले. मध्ययुगीन युरोप व त्या काळातील राजसत्तेचे, सरंजामशाही व भूदासपद्धतीचे स्वरूप व त्यांचे परस्पर संबंध हे त्याच्या अध्ययनाचे क्षेत्र होते. 'Kings and Serfs' हा त्याचा सुप्रसिद्ध ग्रंथ १९२० साली प्रकाशित झाला. त्यानंतरच्या वर्षात 'The Royal Touch, Characteristics of French Rural History' हे त्याचे ग्रंथ प्रकाशित झाले. 'The Royal Touch' यात राजाने स्पर्श केल्यास कातडीचे रोग बरे होतात असा समज मध्ययुगीन फ्रान्स व इंग्लंडमध्ये रूढ होता. ह्याच्या आधारे तत्कालीन समाजाच्या मानसिकतेवर, धर्मश्रद्धा, चमत्कारावरील विश्वास याचे विवेचन ब्लाँच करतो आणि समाजशास्त्र, मानववंशशास्त्र व मानसशास्त्राचा आधार घेऊन १३ ते १६ व्या शतकातील फ्रेंच व इंग्लिश समाजांचा तौलनिक आढावा घेतो. मुख्य म्हणजे त्या काळातील कृषिजीवन, सामाजिक कायदा, न्याय पद्धती यांवर प्रकाश टाकतो. असे करताना घटनांच्या ऐवजी सामाजिक रचनेच्या अभ्यासावर लक्ष केंद्रित करतो. दुसऱ्या महायुद्धात जर्मनव्याप्त फ्रेंच प्रदेशात विकी सरकारविरुद्ध कार्य करणाऱ्या भूमिगत राष्ट्रवादी गटात तो १९४२ साली सामील झाला, दोन वर्षांत तो शत्रूच्या हाती लागला आणि त्याला मृत्यूदण्ड दिला गेला.

**लुसियन फाब्व्रे (Lucien Febvre) :-**

द्वितीय महायुद्धाच्या काळात ॲनल्स नियतकालिकाच्या प्रकाशनाचा खण्डित झालेला धागा युद्ध समाप्तीनंतर ब्लाँचचा ज्येष्ठ सहकारी लुसियन फाने याने उचलला, फ्रान्समध्ये एका सामान्य शाळा शिक्षकाच्या कुटुंबात १८७६ साली जन्माला आलेला लूसियन १९०२ साली इतिहास विषयाचा पदवीधर झाला. या सुमारास त्याचा हेन्री बरशी प्रत्यक्ष संबंध आला आणि इतिहास ही स्वायत्त ज्ञानशाखा नसून मानवी जीवनाशी निगडित इतर ज्ञानशाखांचा अभ्यास इतिहासकाराने अवश्य करावा, विशेषतः भौगोलिक परिस्थिती व मानवी समाज परस्पर निगडित आहेत ही त्याची पक्की धारणा बनली आणि तेच त्याच्या लेखनाचे प्रमुख सूत्र बनले.

१९११ साली फाब्व्रेचे प्रसिद्ध पुस्तक *'Philip II and the French Comte'* हे प्रकाशित झाले. यात ॲनल्स विचारप्रवाहाच्या दृष्टिकोणाची प्रचिती येते. ग्रंथाच्या पहिल्या प्रकरणात तो प्रथम भौगोलिक स्थितीचे विवेचन करतो. मात्र असे करताना, भौगोलिक स्थितीचा समाजजीवनावर होणारा परिणाम अशी मांडणी न करता विशिष्ट प्रदेशातील समाजाची भौगोलिक स्थितीसंबंधीची प्रतिक्रिया अशा पद्धतीने तो दोहोतील संबंध स्पष्ट करतो. त्याचा लिखाणाचा केंद्रबिंदू भौगोलिक स्थिती नसून मानवी समाज हा आहे. फ्रान्समधील एका भूमध्य समुद्रालगतच्या लहान प्रदेशातील समाजजीवन, तेथील चालीरीती, श्रद्धा, समजुती, मानसिक प्रवृत्ती यांचे विश्लेषण तो भौगोलिक संदर्भाच्या पार्श्वभूमीवर करतो. *'A Geographi- cal Introduction to History'* हे त्याचे १९२२ साली प्रकाशित झालेले पुस्तक इतिहास व भूगोलाचा निकटचा संबंध प्रस्थापित करणारे आहे. ॲनल्स विचार प्रवाहाचा खंदा प्रचारक या भूमिकेतून १९४६ ते ५६ पर्यंत त्याने ॲनल्स ह्या नियतकालिकाचे संपादन केले व त्यात मानवी संस्कृतीचा विषय अंतर्भूत केला.

**फर्नाद ब्रोदेल (Fernand Braudel):-**

ॲनल्स प्रवाहातील तिसरा परंतु विशेष महत्त्वाचा इतिहासलेखक म्हणून फर्नाद ब्रोदेल याचा उल्लेख केला जातो. विस्मयजनक स्मरणशक्ती, प्रचंड आकलनशक्ती आणि कुशाग्र बुद्धीची उपजत देणगी लाभलेल्या फर्नादचा जन्म १९०२ साली फ्रान्समधील एका लहान खेड्यात झाला. उच्च शिक्षण घेतल्यानंतर इतिहासाचा शिक्षक म्हणून त्याने व्यावसायिक जीवनाला प्रारंभ केला. मात्र तेथे शिकविला जाणारा इतिहास फार स्थूल स्वरूपाचा, वरवरचा आहे, इतिहासाचा खोल अर्थ उलगडण्यासाठी इतर संबंधित विषयांचा अभ्यास अत्यावश्यक आहे अशी त्याची धारणा बनली. पुढे त्याने अल्जीरिया ह्या फ्रेंच वसाहतीतील अल्जीअर्स विद्यापीठात प्राध्यापकाचे पद घेतले. याच सुमारास फाव्रेशी त्याचा पत्रव्यवहार सुरू झाला. भूमध्य सागराच्या उत्तर किनाऱ्यावरून फाव्रेने त्या सागरालगतच्या प्रदेशाचा अभ्यास केला होता. ब्रोदेलने भूमध्यसागराच्या दक्षिण किनाऱ्याच्या भूमिकेतून त्या सागरालगतच्या प्रदेशाचा अभ्यास करावा असे त्याने ब्रोदेलेला सुचविले. स्पेन व उत्तर आफ्रिकेच्या दुर्लक्षित प्रदेशाचा अभ्यास करण्याचा ब्रोदेलचा मानस यामुळे दृढ झाला. यासाठी सुमारे दहा वर्षे नानाविध स्रोतसाधनांचा प्रचंड प्रमाणावर त्याने अभ्यास केला. याच सुमारास सुरू झालेल्या द्वितीय महायुद्धाच्या काळात अल्जीरियाच्या वतीने त्याने जर्मनीविरुद्धच्या लढ्यात उडी घेतली. त्यात १९४० साली तो जर्मन सैन्याच्या हाती पडला व त्याला कारावासात टाकण्यात आले. ह्या एकाकी बंदिस्त कालावधीत भूमध्य सागरानजिकच्या प्रदेशातील मानवी जीवनाचा विषय त्याच्या मनात घोळत राहिला आणि केवळ स्मरणशक्तीच्या आधारे सोळाव्या शतकातील स्पेनचा प्रख्यात राजा दुसरा फिलीप याच्या शासनकाळातील भूमध्य सागरानजिकच्या प्रदेशाचा एका शतकाचा इतिहास शब्दबद्ध करणारा सुमारे एक हजार पृष्ठांचा ग्रंथ त्याने कारावासातच तयार केला. मुक्तता झाल्यानंतर काही सुधारणा करून तो ग्रंथ त्याने १९४९ साली प्रकाशित केला. अमाप शासकीय कागदपत्रे, अभिलेखागारातील नानाप्रकारची कागदपत्रे, व्यापारी शहरातील कागदपत्रे अशा प्रचंड स्रोतांवर हा ग्रंथ आधारलेला आहे. एका विशाल, भव्य फलकावर भूमध्य समुद्रालगतच्या प्रदेशातील सोळाव्या शतकातील समाजजीवनाचे, आर्थिक स्थितीचे, राजकीय उलाढालींचे शास्त्रीय पद्धतीने चित्रण करणारा '*The Mediterranian and The Mediterranian World in the Age of Philip II*' हा ग्रंथराज अभिजात इतिहासग्रंथ ठरला. यात भूमध्य सागरालगतचा युरोप, उत्तर आफ्रिकेचा भाग व अटलांटिक सागराचा भाग ह्याची भौगोलिक स्थिती, तेथील शहरे, दळणवळण, समाज जीवन, आर्थिक व राजकीय रचना व तत्कालीन महत्त्वाच्या व्यक्ती यांचे चित्रण तो करतो. ऑटोमन तुर्की साम्राज्यावर विजय मिळवून देखील फिलीपला सागरावर नियंत्रण ठेवता आले नाही, स्पॅनिश जगाची घसरती आर्थिक स्थिती, दळणवळणाची अपुरी साधने, सामाजिक रचना यांमुळे त्याला पूर्व युरोपकडून अटलांटिककडे वळावे लागले, अशी फिलीपच्या धोरणांची कारणमीमांसा तो करतो. 'Civilization and Capitalism' ह्या तीन खण्डांच्या मोठ्या ग्रंथात तो पंधरा ते अठराव्या शतकातील जागतिक अर्थव्यवस्थेचा, सामान्य माणसाची आर्थिक स्थिती, भांडवलशाहीची प्रक्रिया व तिचा प्रसार यांचे तपशिलात विवेचन करतो.

भूमध्यसागरावरील ग्रंथाच्या प्रस्तावनेत ब्रोदेल स्वतःची व पर्यायाने ॲनल्स विचारप्रवाहाची भूमिका निःसंदिग्धपणे मांडतो. इतिहासात घटना अगर व्यक्ती महत्त्वाच्या नसतात, फिलीप सारख्या महान व्यक्तींचे निर्णय देखील परिस्थितीने नियंत्रित असतात, 'despite their illu- sions, they were more acted on than actors' असे विधान तो फिलीपच्या संबंधात करतो. याच प्रस्तावनेत घटनाधिष्ठित इतिहास नाकारण्याची कारणे सांगताना तो म्हणतो की, घटनांचा इतिहास स्थूल स्वरूपाचा, वरवरचा, पाण्याच्या लाटांवर येणाऱ्या फेसासारखा असतो. (Resounding events are often only momentary outbursts, surface mani- festations of larger movements). यामुळे भूमध्यसागरावरील ग्रंथाचा नायक फिलीप दुसरा नसून समुद्र आहे. बंदिस्त माणसाचे प्रतीक वापरून तो म्हणतो की, 'मानव हा भौतिक परिस्थिती व कालप्रवृत्ती व काळाच्या मानसिकतेचा (mentalitie) बंदी असतो. इतिहासात अंगभूत ऐक्य असते आणि हे ऐक्य म्हणजे मानवी जीवनाचे ऐक्य असते आणि म्हणून सर्व घटकांचे आकलन अत्यावश्यक आहे.' (Everything must be recaptured and relo- cated in the general framework of history so that... we may respect the unity of history which is also the unity of life) त्याच्या लिखाणात भौगोलिक परिस्थतीला

अवास्तव महत्त्व दिले गेले, ह्या आक्षेपाला उत्तर देतांना तो "history is not made by geographical features but by the men who control and discover them" असे विधान करून ब्रोदेल भौगोलिक स्थितीच्या संदर्भात मानवी जीवनाचे महत्त्व अधोरेखित करतो.

**इमॅन्युअल राय लादुरी (Emmanuel le Roy Laduri) :-**

हा ॲनल्स गटातील विसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील प्रख्यात इतिहासकार होय. त्याचे दहा ग्रंथ प्रकाशित झाले असून '*The Beggar and the Professor*' '*Saint Simon and the Court of Lousi XIV*' व '*History of France*' चे तीन खण्ड हे त्यांपैकी विशेष गाजलेले ग्रंथ होत. 'The Beggar and the Professor' यात सोळाव्या शतकातील मॉंटेलो ह्या एका लहानशा फ्रेंच खेड्यातील एका कुटुबांची जीवनकथा सांगण्याच्या ओघात तो तेथील समाजजीवनाचे बहुस्तरीय चित्रण करतो. धर्मसुधारणा चळवळ, त्या काळातील धर्मश्रद्धा, व्यापार वृद्धी, भांडवलपद्धती, प्लेगचा प्रसार, लढाया यांचे वर्णन करतो. मॉंटेलो हे गाव धार्मिक बंडखोरांचे केंद्र होते, त्यांची चौकशी करण्याचे आदेश स्थानिक धर्मगुरूने दिले, त्या समितीने अनेक गावकऱ्यांच्या जबान्या घेतल्या. ह्या सर्व हस्तलिखितांच्या आधारे लादुरी तेथील जनजीवन, त्यांची संस्कृती, घरांची पद्धती, काळ, ईश्वर, धर्म, निसर्ग, कुटुंब, जन्ममृत्यू इतकेच नव्हे तर लैंगिक जीवनाबाबतचे गावकऱ्यांचे विचार मांडतो. अतिसूक्ष्म घटकाच्या सखोल अध्ययनाचा (Micro history) हा उत्तम नमुना मानला जातो. या खेरीज सतराव्या व अठराव्या शतकातील फ्रान्समधील कृषि जीवनाचा, त्यातील परिवर्तनांचा तो सूक्ष्म अभ्यास करतो. यावरून ॲनल्सच्या मते इतिहास विषयाची व्याप्ती व त्याचे स्रोत किती अमर्याद आहेत हे दिसून येते. लादुरी हा तळागाळातील समाजाच्या इतिहासाचाही (History from Down Below) समर्थक आहे.

पीटर बर्क ह्या ब्रिटिश इतिहासकाराने आपल्या 'The French Historical Revolu- tion: The Annales school: 1929-1989' ह्या १९९० साली प्रकाशित झालेल्या ग्रंथात ॲनल्स इतिहासप्रवाहाचे तीन टप्पे कल्पिले आहेत. पहिला १९२० ते ४५ चा ब्लॉंच व फात्रेचा काळ पारंपारिक इतिहासलेखनाला आव्हान देऊन इतिहासाबाबत अभिनव भूमिका मांडणाऱ्यांचा काळ; दुसरा काळ १९४५ ते १९६५ या दरम्यान ॲनल्सच्या इतिहासविषयक भूमिकेला दृढता आली; विषय मांडणीच्या पद्धतीला, आशयाच्या हाताळणीला निश्चित आयाम प्राप्त झाला; सामाजिक संरचना व विविध घटकांचा समन्वय, दीर्घकालीन परिवर्तनांचा अभ्यास हे निश्चित क्षेत्र बनले. ब्रोदेल हा या काळाचे प्रतिनिधित्व करतो. तिसरा काळ १९६५ नंतरचा ! ह्या कालावधीत ॲनल्स गटातील विविध लेखकांच्या भूमिकेतील सादृश्य लोपू लागले, हा गट फुटून काही लेखक समाजरचनेच्या सामाजिक व आर्थिक भाष्याकडे, काही सामाजिक व सांस्कृतिक भाष्याकडे तर काही राजकीय घडामोडींच्या पुनर्विचाराकडे व पुनर्मांडणीकडे वळले. ॲनल्स इतिहासप्रवाहाचे असे चिकित्सक समीक्षण करताना त्या प्रवाहाने इतिहासाची व्याप्ती अमर्याद वाढविली, तोवरच्या दुर्लक्षित विषयांवर लक्ष केंद्रित केले, नव्या स्त्रोतसाधनांचे महत्त्व प्रतिपादित केले, तशी साधने हाताळण्याच्या नव्या पद्धती रूढ केल्या, इतिहासाचे एकाकीपण संपवून त्याचा इतर ज्ञानशाखांशी संबंध प्रस्थापित केला व ह्या गटाने अभिनव अशा मौलिक ऐतिहासिक साहित्याची निर्मिती केली, असे प्रशंसोद्धार पीटर बर्क काढतो. पीटर टॉश ह्या लेखकाने 'The Pursuit of History' ह्या पुस्तकात, विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात जे नव्या दिशांनी इतिहासलेखनाने झाले, त्याचे श्रेय ॲनल्सच्या इतिहासलेखनाने केलेल्या योगदानाला दिले आहे.

**आक्षेप :-**

ॲनल्सच्या अभिनव लेखनप्रयोगाचे संमिश्र स्वागत झाले. पीटर बर्कसारख्यांनी अगर रॉडने हिल्टन व एरिक हॉब्जबॉम ह्या मार्क्सवादी इतिहासकारांनी त्यांच्या लेखनवैशिष्ट्यांचे मोल जाणले. मात्र काही परंपरावादी इतिहासलेखकांनी व समीक्षकांनी त्याच्यावर आक्षेप घेतले. फॅन्कोइस फरेट याच्या मते १) हे लेखक इतर ज्ञानशाखांची इतिहासाशी अतिशय सरमिसळ करीत असल्यामुळे इतिहासाला त्यांनी 'Polymorphus dis- cipline' बनविले आहे. २) दुसरा आरोप असा की कालक्रम हा इतिहासाचा आत्मा आहे; हा प्रवाह त्यालाच स्थळापेक्षा गौण स्थान देत

असल्यामुळे त्यांच्या लिखाणाला अनैतिहासिक व अविश्वसनीय रूप येते. ३) त्याची संशोधन पद्धती गुंतागुंतीची आहे व त्यामुळे अभ्यासकाला गोंधळात टाकणारी आहे. ४) काळाची मानसिकता (mentalitie) व सामूहिक अंतर्जाणिवांचा शोध घेता घेता सामाजिक विषमता, शोषण, वर्गकलह अशा गंभीर सामाजिक समस्यांकडे त्यांचे दुर्लक्ष होते. ५) विविध ज्ञानशाखांच्या अभ्यासातून त्यांनी परिभाषा उचलल्यामुळे त्यांचे लिखाण कधी कधी बोजड, रटाळ व अनाकलनीय होते. ६) भोवतालची परिस्थिती मानवाच्या कृती नियंत्रित करते ह्या त्यांच्या गृहितकृत्यामुळे त्याचे लिखाण नियतवादाकडे झुकते. ७) काही विशिष्ट ज्ञानशाखांवर, उदाहरणार्थ, समाजशास्त्र, भूगोल यांवर विशेष भर दिलेला असल्यामुळे 'संपूर्ण इतिहासाचा' त्यांचा दावा वास्तवात खरा ठरत नाही. मूल्यमापन :- असे काही आक्षेप ॲनल्स गटाच्या इतिहासलेखनावर करण्यात येत असले तरी ह्या प्रवाहाने इतिहासलेखनाला केलेले योगदान व त्याचे वैशिष्ट्यपूर्ण स्थान कोणी नाकारत नाही. ह्या गटात मोडणारे इतिहासलेटक बुद्धिवंत, व्यासंगी व शास्त्रीय दृष्टिकोणाचे व कोणत्याही सैद्धांतिक भूमिकेला बांधलेले नसल्यामुळे त्यांनी इतिहासलेखनाला नवा आशय व नवी पद्धती यांची देणगी दिली. आर्थिक रचनेचा व समाजातील दुर्लक्षित गटांचा ते विचार करीत असल्यामुळे मार्क्सवा तशी त्यांची भूमिका काही अंशी जुळती आहे.

ॲनल्स गटाच्या भूमिकेचा थोडक्यात विचार करावयाचा झाल्यास ह्या गटाने इतिहासलेखनात पुढील गोष्टी ठामपणे नाकारलेल्या दिसतात.

१) इतिहासलेखनात त्याकाळी प्रचलित असलेल्या व्यक्ती व घटनाधिष्ठित आशयाला गौण स्थान दिले.

२) कालक्रमानुसार घटनांच्या मांडणीतून मानवी जीवनाचे वास्तव रूप कळत नाही, म्हणून अशा मांडणीला गौण स्थान दिले.

३) तसेच केवळ राजकीय, राजनैतिक अगर लष्करी इतिहास म्हणजे मानवी जीवन नाही, म्हणून असे लिखाण वर्ज्य मानले.

४) याच दृष्टीने इतिहास लेखनातील विभागीकरण व विशेषीकरण मानवी जीवनाचे अनैसर्गिक, संकुचित व विकृत दर्शन घडवितात म्हणून त्याज्य मानले.

५) इतिहास ही पूर्णतः स्वायत्त ज्ञानशाखा असून ती इतरांहून भिन्न आहे ही भूमिका

अमान्य केली.

६) गतकालीन मानवी जीवनाचे वास्तव दर्शन अभिलेखागारीय अथवा केवळ लिखित खोतांच्या आधारानेच केले पाहिजे ही प्रत्यक्षवादी भूमिका त्यांनी फेटाळून लावली.

वरील नकारात्मक घटकांबरोबर पुढील सकारात्मक घटक त्यांच्या इतिहासविषयक भूमिकेचे मूलाधार आहेत.

१) एककालिक घटनेऐवजी इतिहासविषयाची व्याप्ती दीर्घकालीन असावी. यामुळे समाजजीवनाचे योग्य दर्शन घडते.

२) ऐतिहासिक व्यक्ती अगर घटनाऐवजी समाजरचना, अर्थरचना, संस्कृती, सामाजिक परिवर्तन प्रक्रियांचा अभ्यास हा इतिहासविषय असावा. स्थूल स्वरूपाच्या वरवरच्या सामूहिक घटनांऐवजी मानवी कृतीमागील सर्व कारकांचा शोध मानवी कृतीचे मर्म उलगडून दाखवितो.

३) कालक्रमापेक्षा त्यांच्या मते स्थळ (space), भौगोलिक परिस्थिती अधिक महत्त्वाची आहे. सर्व मानवी कृती व प्रवृत्ती स्थलवैशिष्ट्यांनी नियंत्रित होतात. परिस्थिती व मानवी कृती केवळ परस्परसंबद्धच नाही तर परस्परावलंबी आहेत.

४) ह्या परस्परावलंबित्वाचे आकलन शास्त्रीय पद्धतीचा वापर करून व इतर मानव्य ज्ञानशाखांच्या मदतीने करून घेता येते व स्थूल स्वरूपाचे निष्कर्ष काढता येतात.

५) मानवी समाज एकात्म आहे; त्याचा प्रत्येक पैलू वेगळा तरीही परस्परसंलग्न आहे. म्हणून मानवी समाजाच्या सर्व अंगांचा साकल्याने, सर्वसमावेशक दृष्टीने अभ्यास करून त्यात दडलेले एकसूत्र समजून सांगण्याचे कार्य इतिहासाने करावयाचे आहे.

६) मानवी जीवनाचे दर्शन घडविणारी इतिहास ही स्वायत्त अध्ययनशाखा नाही, इतर सामाजिक शास्त्रांशी तिचा निकटचा संबंध आहे. म्हणून गतकालीन मानवी जीवनाचे चित्रण करणाऱ्या इतिहासाने आपला एकाकीपणा टाकून देऊन इतर मानव्यशास्त्रांशी निकटचा संबंध प्रस्थापित करावा. इतिहास ही मानवशास्त्राची जननी आहे (History is a science of hu manity) ही त्याची भूमिका आहे.

७) गतकालीन मानवी समाजाचे सम्यक् आकलन होण्यासाठी युगप्रवृत्तींचा शोध आवश्यक आहे. असा शोध घेण्यासाठी पारंपारिक स्रोतांची नव्या दृष्टीने चिकित्सा करणे तसेच अपारंपारिक स्रोतांचा वापर आवश्यक आहे.

ॲनल्स इतिहासलेखनप्रवाहाकडे प्रारंभीच्या काळात काहीशा साशंकतेने पाहिले गेले असले, तरी विसाव्या शतकाच्या मध्यानंतर त्याचा प्रसार युरोप, अमेरिका, ब्राझील इत्यादी देशांत झाला. इतकेच नव्हे तर सोविएत सत्तेच्या पतनापूर्वी काही सोविएत इतिहासकार आर्थिक हेतुमूलकतेचा पर्यायी प्रवाह म्हणून ॲनल्सकडे वळू लागले होते. या गटाशी विचारसाधर्म्य असलेले, संपूर्ण इतिहासाचा (Total history) पुरस्कार करणारे हॉब्जबॉम व हिल्टन सारखे लेखक वेगळ्या प्रकारच्या सामाजिक इतिहासाकडे वळले. ॲनल्सच्या विचारसरणीचा तत्कालीन इतिहासलेखनावरील प्रभाव वादातीत आहे.